वर्ष १० वें अंक ४ था

२४ एप्रिल १९५९

# संजीवन

जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक



संजीवन कार्यालय, श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी – २

## २९ मार्च १९५९

ज्या जगामध्यें आतांपर्यंत मनोनिष्ठ बुद्धि हीच क्रमविकासाची उच्चतम निर्मिति आणि अग्रेसर शक्ति आहे, त्यामध्यें अतिमानसिक चेतनेच्या अवतरणाचे नेमके काय परिणाम होतील, याचें मनानें भाकित करणें कदाचित् तितकेंसें उपयुक्त होणार नाहीं. कारण, अतिमानस ही एक अशी चेतनाशक्ति आहे कीं, ती मनापेक्षां अगदींच भिन्नप्रकारें कार्य करील आणि या उच्चतर शक्तीच्या स्व–संघटनामध्यें किंवा तिच्या येथील कार्यामध्यें, तिच्याकरतां मनानें घालून दिलेल्या पद्धती तिच्याकडून मानल्या न जाण्याचाच संभव आहे.

–– श्रीअरविंद

वर्षं १० अंक ४ था

२४ एप्रिल १९५९

# संजीवन

## जीवनाच्या सर्वांगीण विकसनार्थ त्रैमासिक



संपादकः

भालचंद्र लिमये

## संजीवन कार्यालय

श्रीअरविन्द आश्रम, पाँडीचेरी

# ४ एप्रिल १९५९

नवीन जन्म तुमच्या हृदयामध्यें प्रकट होऊं दे; शांति व आनंद या रूपांत त्याचा प्रकाश प्रसरित होऊन तुमच्या अस्तित्वाचीं सर्व अंगें, मन, दृष्टि, संकल्पशक्ति, भावना, प्राण आणि शरीर त्यानें व्यापून जाऊं देत. तुमच्यामधील सर्वांसह तुम्ही श्रीमातेचें बालक होईपर्यंत तुमच्या जीवनांतील प्रत्येक दिवस या नूतन जन्माच्या वाढीचा आणि अधिकाधिक परिपूर्णतेचा दिवस ठरूं दे. तुमचें आंतरबाह्य अस्तित्व म्हणजे अखंड गतिधारारूप होईपर्यंत आणि त्याच्या शांतीची, सामर्थ्याची व आनंदाची अभिव्यक्ति होईपर्यंत दिव्य प्रकाश, शक्ति आणि उपस्थिति तुम्हांला त्यांच्या आवरणाखालीं घेऊं देत.

CWSA : Vol 34 : Page 838

—श्रीअरविंद

वार्षिक वर्गणी—यथाशक्ति.

संपादक—भालचंद्र लिमये.

प्रकाशक—'संजीवन कार्यालय', श्रीअरविंद आश्रम, पांडीचेरी.

मुद्रक—श्रीअरविंद आश्रम प्रेस, पांडीचेरी.

242/59/3/850

# २४ एप्रिल १९५९

दिव्य पूर्णता ही नेहमीं आपल्या वर विद्यमान् असतेंच; पण चेतनेमध्यें आणि कर्मामध्यें दिव्यता येणें आणि आंतरबाह्य दिव्य जीवन जगणें हा मानवासाठीं आध्यात्मिकता याचा अर्थ आहे; या शब्दाला दिलेले इतर सर्व गौण अर्थ म्हणजे अपुरे व चांचरे बोल किंवा वंचना होय. CWSA : Vol 25 : Page 262

—श्रीअरविंद

# अनुक्रमणिका


| विषय | | पान |
|---|---|---|
| १ प्रार्थना आणि ध्यान | श्रीमाताजी | ५ |
| २ गीतेचा सारभूत अर्थ | श्रीअरविंद | ८ |
| ३ उदयाचळीं मित्र आला— | गजराज | १५ |
| ४ सुव्यवस्था (विद्यार्थ्यांसाठीं) | श्रीमाताजी | १८ |
| ५ मातृवाणी | श्रीमाताजी | २३ |
| ६ साधना आणि मानवी संबंध (पत्रें) | श्रीअरविंद | २६ |
| ७ श्रीअरविंद वाङ्मय | मा. पुं. पंडित | २८ |
| ८ नागपूर प्रकरण आणि खरी एकता | श्रीअरविंद | ३३ |
| ९ वाचकांचे प्रश्न | रेवान् | ३५ |
| १० वाङ्मय आणि वाचन | श्रीमाताजी | ३६ |
| ११ साहित्य-सत्कार | | ४१ |
| १२ आश्रम-वृत्त | | ४४ |



वर्ष १० अंक ४ था २४ एप्रिल १९५९

# संजीवन



तमसापलीकडील उच्चतर ज्योति पहात,
देवतांमधील दिव्य सूर्याप्रत, सर्वोच्च ज्योतिप्रत आम्ही आलो.

ऋग्वेद–१.५०.१०

## प्रार्थना आणि ध्यान

२३ फेब्रुवारी १९१४

हे जगन्नायका, तुझ्या नियमनाविषयीं आम्हीं अधिकाधिक जागृत व्हावें, म्हणजेच त्याचा आविष्कार सर्व वस्तुमात्रामध्यें सुगमतेनें व्हावा म्हणून तुझ्या नियमनाशीं 'एकरूप' होतां यावें असें वरदान दे.

हे जगदीशा, अशी कृपा कर कीं, त्यामुळें मी माझ्या भटक्या विचारांवर स्वामित्व मिळवूं शकेन, तुझ्याचमध्यें राहून, केवळ तुझ्याच द्वारां मी जीवनाचा बोध करून घेऊं शकेन, भौतिक अस्तित्वाच्या भ्रमाचा निरास होऊन, त्याठिकाणीं तुझ्या सनातन अस्तित्वास अधिक अनुरूप असें ज्ञान येईल.

तुझ्याच दिव्य प्रेमामध्यें मला सदासर्वदा निवास करूं दे; म्हणजे तेंच दिव्य प्रेम माझ्यामध्यें राहून माझ्याद्वारां कार्यकारी होईल.

मी एक तुझ्या कार्यांतील उपयुक्त आणि सूक्ष्मदर्शी सहयोगी होऊन, तुझ्या आविष्काराची परिपूर्ति सुगम करण्यास माझ्यामधील सर्व कांहीं साह्यभूत होवो, असा मला वर दे.

माझ्या अपूर्णता, अडचणी आणि दुर्बलता मला माहीत आहेत; माझ्या अज्ञानाचीहि जाणीव मला आहे; पण तुझ्याचवर माझा सारा भार टाकून निःशब्द भक्तिभावानें मी तुझ्यापुढें नतमस्तक होत आहे.



*

२५, २६ फेब्रुवारी १९१४

तुझी योग्य रीतीनें सेवा करण्याची ज्याची इच्छा आहे, त्यानें कोणत्याच गोष्टीविषयीं आसक्त असतां कामां नये; ज्या क्रियांमुळें तुझ्याशीं अधिक जागृतरूपानें संबंध प्रस्थापित करण्यास मदत होत असेल त्याविषयींसुद्धां त्याला आसक्ति असतां कामां नये......परंतु परिस्थिति जर अशी असेल कीं तिचा परिणाम होऊन त्यामुळें भौतिक वस्तू नेहमींपेक्षां जीवनांत अधिक प्रभावशाली होत असतील, तर त्यांच्यामध्यें गुंतून कसें जावयाचें नाहीं हें आम्हांला कळलें पाहिजे. हृदयगाभाऱ्यांतील तुझ्या उपस्थितीचें स्पष्ट अंतर्दर्शन अविचल राखून, अप्रक्षुब्ध अशा प्रसन्न शांतीमध्यें अखंडपणें रहातां आलें पाहिजे.

खरोखर, सर्वत्र, सर्व वस्तुजातामध्यें केवळ तुझेंच दर्शन घेऊन प्रत्येक कर्म करणें आणि केलेल्या कर्मांपासून खूप खूप उंच दूर अलिप्तपणें उड्डाण करणें हें किती भाग्याचें! .... बंदिवानासारखे पृथ्वीला जखडून टाकणारें कोणतेंहि बंधन आम्हांला त्यावेळीं असणार नाहीं, आमच्या उड्डाणामध्यें ओझें आणणारें कांहींहि असणार नाहीं!

हे प्रभो, माझ्या जीवनाचें जें समर्पण मी करीत आहे तें सर्वांगपरिपूर्ण आणि परिणामकारी होऊं दे.

हे शब्दातीत अचिन्त्य तत्त्वरूपा, अनाम सत्यरूपा, सादर आणि प्रेमळ भक्तिभावानें मी तुला वंदन करीत आहे.

CWMCE : Vol 01 : page 84

★

२७ फेब्रुवारी १९१४

हे प्रभु, तुजप्रत ज्यांचीं जीवनें समर्पित झालीं आहेत अशांच्या वांटचास येणाऱ्या असीम समाधानाचा आस्वाद मी आधींच घेत आहे. हा आस्वाद कोणत्याहि बाह्य परिस्थितीवर नव्हे, तर व्यक्तीच्या पातळीवर व तिला लाभलेल्या कमी अधिक ज्ञान-प्रकाशावर अवलंबून असतो. तुझ्या नियमनास पूर्णरूपानें आत्म-समर्पण करण्यानें, भोंवतालच्या विविध परिस्थितींमध्यें कांहीं ना कांहीं बदल हा होतोच; तरीपण या परिस्थितीमुळें हें पूर्ण समर्पण शक्य होते वा व्यक्त होऊं शकतें असें नाहीं. म्हणजे मला असें म्हणावयाचें आहे कीं, तुझ्या या नियमनाची अभिव्यक्ति सर्वांच्या बाबतींत सारख्या अशा विशिष्ट परिस्थितींतच होईल असें नाहीं. कारण प्रत्येकाच्या स्वभावविशेषाप्रमाणें म्हणजेच प्रत्येकाचें या भौतिक जीवनामध्यें त्या त्या वेळेपुरतें जें कांहीं नियत-कार्य असेल त्याप्रमाणें ही अभिव्यक्ति वेगवेगळ्या प्रकारची असणार.

तरीपण, ज्यांचीं जीवनें तुझ्या चरणीं पूर्णरूपानें समर्पित झालीं आहेत, ज्यांच्या जीवनांत अंधार उरलेला नाहीं, अज्ञान सरलें आहे, अहंप्रधान आसक्ति नाहीं, कोणत्याहि प्रकारची अशुभ इच्छा वास करीत नाहीं, त्या सर्वांना सारखी व न बदलणारी अशी कोणती गोष्ट लाभत असेल तर ती म्हणजे सानंद शांति आणि तेजोमय व अविकारी प्रसन्नता.

प्रभो, सर्वांनाच या दिव्य शांतीची जाणीव होऊं दे.

CWMCE : Vol 01 : page 85

★

१ मार्च १९१४

सर्व प्रकारचे अडथळे व अडचणी स्वतःमध्येंच असतात. स्वतःमध्येंच सर्व तऱ्हेचा अंधःकार व अज्ञानहि असतें. जरी आम्ही साऱ्या पृथ्वीवर भटकत राहिलो किंवा कोणत्या तरी विजनस्थळीं जाऊन स्वतःस कोंडून घेतलें, सर्व तऱ्हेच्या संवयीं मोडून टाकून अगदीं तपस्वी जीवन व्यतीत करूं लागलों तरी, जोंवर कोणत्यातरी स्वरूपाच्या भ्रांतीच्या बंधनामुळें आमची जाणीव तुझ्या दिव्य एकमेव चेतनेपासून दूर रहात असेल, अहंविशिष्ट आसक्ति ही तुझ्या दिव्य प्रेमाशीं आमचें परिपूर्ण तादात्म्य घडूं देत नसेल, तोंवर बाह्य परिस्थिति कशीहि असली तरी आम्ही तुजसमीप येऊंच शकणार नाहीं. वास्तविक परिस्थिति ही, स्वतः अनुकूल किंवा प्रतिकूल असूं शकते कां ? मला संशय वाटतो. मला वाटतें, त्यासंबंधींची आपण जी कल्पना करून घेतलेली असते त्यावर, परिस्थितीनें मिळालेले धडे लाभदायक किंवा हानी-कारक होणें, अवलंबून असतें.

हे प्रभो, माझी प्रार्थना आहे. माझ्या व्यक्तित्वामध्यें असलेल्या अंशाअंशामध्यें मी पूर्णतः जागृत व्हावें व त्यावर प्रभुत्व संपादावें असें वरदान मला दे. म्हणजे माझी स्व-पासून मुक्तता होऊन माझ्यांतील भिन्न भिन्न तत्त्वांमध्यें एकमेव तूंच निवास करशील व त्याद्वारां तूंच कार्य करशील.

उच्चतम अभिव्यक्तीशीं अविभाज्यपणें एकरूप होऊन प्रेमामध्यें, प्रेमानें व प्रेमाकरतांच जगणें. . . . किती भाग्याचें हें !

उत्तरोत्तर अधिक प्रकाश, अधिकाधिक सौंदर्य आणि अधिकाधिक सत्य प्राप्त होवो !

—श्रीमाताजी

CWMCE : Vol 01 : page 86

एक साधक आणि दुसरा साधक किंवा एक साधिका आणि दुसरी साधिका यांमध्यें जसें नातें असतें, तसेंच फक्त नातें येथें एक साधक आणि एक साधिका यांच्यामध्यें असावें. एकाच योगमार्गावरील पथिक किंवा एकाच मातेची बालकें म्हणून असलेलें मैत्रीचें नातें चालण्यासारखें आहे.

CWSA : Vol 35 : Page 723

—श्रीअरविंद

# गीतेचा सारभूत अर्थ

श्रीअरविंदांच्या 'गीतेवरील निबंध' (Essays on the Gita) या ग्रंथांतील शेवटचे दोन अध्याय या अंकापासून क्रमशः देणार आहोंत. हा अनुवाद श्री० सेनापति पां. म. बापट यांनीं अत्यंत आपुलकीनें करून दिला आहे. ——संपादक

**गीतेची शिकवण आजहि उपयुक्त**

गीता लिहिली गेल्यानंतर आजपर्यंत दीर्घ युगें, दीर्घ कालखंड उलटून गेले आहेत; या गीतोत्तर कालांत गीताकालीन विचारांत आणि अनुभवांत मोठमोठे बदल झालेले आहेत. तेव्हां प्रश्न असा आहे कीं, अशा बदलांनंतर आणि अशा दीर्घ कालानंतर आजच्या मानवी मनाला गीतेचा आध्यात्मिक दृष्ट्या उपयोग काय आहे? तिचा आजच्या मानवास काय संदेश आहे? तिचें व्यावहारिक मूल्य काय आहे? मानवी मन नेहमीं पुढें पुढेंच जात असतें; तें आपला दृष्टिकोन, दर्शनस्थान बदलीत राहतें, आणि तदनुसार आपल्या विचारधनांत भर घालीत राहतें; मानवी मनांतील या बदलांचा परिणाम भूतकालीन विचारपद्धति कालहत अर्थात् रद्द करण्यांत होतो; किंवा या पद्धती कालबाह्य न होतां टिकविल्या गेल्या तर त्यांत फेरफार आणि विस्तार केला जाऊन त्यांच्या मूल्यांत स्पष्ट किंवा अस्पष्ट सूक्ष्म, बदल केला जातो. एखादी प्राचीन विचारपद्धति किंवा मतप्रणाली कालान्तरानें रद्द न होतां, वरील प्रक्रियेला (विषयविस्तार, फेरफार, मूल्यांतर करणाऱ्या प्रक्रियेला) स्वाभाविकपणें, सहजपणें तोंड देऊन कितपत टिकून राहते, ह्यांत तिच्या जिवंतपणाची खूण आहे. कारण या तिच्या टिकण्याचा अर्थ असा होतो कीं, या विचारप्रणालीच्या बाह्यरूपामध्यें, मांडणीमध्यें कितीहि मर्यादितपणा किंवा लुप्त होण्यासारखा भाग असला तरी, ज्या सारभूत तत्त्वावर, ज्या जिवंत दर्शनावर आणि अनुभूतीवर या विचार-पद्धतीची उभारणी प्राचीन काळीं केली गेली, त्यांचें सत्यत्व प्राचीनकालाइतकेंच आजहि निर्दोष आहे, तें सर्वकाळीं निर्दोष व अर्थपूर्ण राहील असें आहे. गीता ही अनेक दीर्घ युगांचे धक्के खाऊनहि आज चांगलीच टिकून आहे, तिच्यांतील प्राचीन विचारपद्धतीनें असामान्य जिवंतपणा, जोम दाखविला आहे; महाभारतांत ती स्वभावतः आली किंवा ती स्वतंत्र असून त्यांत घातली गेली तो काळ फार प्राचीन; त्या प्राचीनकाळीं तिच्यांत जो नवीनपणा, ताजेपणा होता, जवळ जवळ तितकाच ताजेपणा आजहि तिच्यांत भासतो; तिचा खरा गाभा त्या काळाइतकाच आजहि ताजा भासतो; कारण या गाभ्याचा, सारतत्त्वाचा अनुभव केव्हांहि, आजहि आम्हांला घेतां येतो. भारतांत ज्या थोर संप्रदायांना धार्मिक विचार-व्यापारावर सत्ता गाजविण्याचा सर्वश्रेष्ठ अधिकार आहे, अशा संप्रदायांत गीता-संप्रदायाची आजहि गणना होते, आजहि धर्मविषयक भिन्न मतें व श्रद्धा असणारे बहुतेक सर्व धार्मिक लोक गीतेची शिकवण सर्वच्या सर्व मान्य करीत नसले तरी, ही शिकवण अत्यंत मोलाची आहे, ही गोष्ट ते मान्य करतात. आज भारतांत गीतेचा

प्रभाव केवळ तात्त्विक किंवा केवळ बौद्धिक नसून तो प्रत्यक्ष आणि जिवंत स्वरूपाचा आहे; तिचा प्रभाव जसा विचारावर आहे, तसाच आचारावरहि आहे; एका राष्ट्राच्या, एका संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाच्या व नवनिर्माणाच्या कार्यांत गीतेच्या कल्पना आज सक्रिय भाग घेत आहेत; या कार्याला विशिष्ट आकार देण्याचें आपलें थोर सामर्थ्य प्रकट करीत आहेत. एका थोर पुरुषानें नुकतेंच असें देखील म्हटलें आहे कीं, आम्हांला आध्यात्मिक जीवनासाठीं जेवढ्या आध्यात्मिक सत्याची आवश्यकता आहे, तेवढें सर्व सत्य गीतेमध्यें आम्हांला मिळतें. हे उद्‌गार अक्षरशः खरे आहेत अशी मान्यता देणें हें, अंध, विवेकशून्य ग्रंथप्रामाण्याला उत्तेजन दिल्यासारखें होणार आहे. आत्म्याचें सत्य अनंत, अमर्याद आहे; न्यायतः त्याला अशी मर्यादा घालतां येत नाहीं. एवढें मात्र म्हणतां येईल कीं, अध्यात्ममार्गांत मार्गदर्शक ठरणारीं बहुतेक प्रमुख तत्त्वें गीतेंत आहेत; आणि म्हणून गीतेनंतर ज्या आध्यात्मिक अनुभूति आणि आध्यात्मिक शोध लागले आहेत ते सर्व जमेस धरूनहि, आज देखील गीतेकडून आम्हांला विशाल अंतःस्फूर्ति आणि मार्गदर्शन मिळूं शकतें. भारताबाहेरहि सर्वत्र, जगांतील एका थोर धर्मग्रंथाचा मान गीतेला दिला जातो. अर्थात् युरोपीयांना गीतेंतील आध्यात्मिक साधनेचें गूढ चांगलेसें उमगत नाहीं; त्यापेक्षां तिच्यांतील विचारप्रणाली त्यांना चांगली समजते. असो. गीतेंत मांडलेल्या विचारांत, गीतेंत प्रकट केलेल्या सत्यांत, आजहि जो जिवंतपणा व प्रभावी तेज दिसतें त्याचें मूळ कशांत असावें बरें?

**गीतेंतील समन्वय––**

गीतेच्या तत्त्वज्ञानाच्या आणि योगाच्या मध्यवर्ति गाभ्यांत हें मूळ आहे. हा गाभा, हा प्रमुख आकर्षक विचार गीतेच्या आरंभीं, शेवटीं आणि मध्यें अखंडपणें मांडलेला आढळतो. हा आकर्षक विचार म्हणजे मानवाचा बाह्य वास्तव जीवनव्यापार व इतर व्यवहार आणि त्याला त्याच्या अंतरंगांत अनुभवास येणारें सर्वश्रेष्ठ परिपूर्ण आध्यात्मिक सत्य या दोहोंमध्यें पूर्ण समन्वय साधण्याचा, या दोहोंची एकप्रकारची एकता साधण्याचा विचार होय. अध्यात्म आणि व्यवहार यांत तडजोड करून वागणें ही सर्वसामान्य प्रथा आहे; पण ही तडजोड कांहीं या बाबतींतील अंतिम व समाधानकारक उत्तर होऊं शकत नाहीं. अध्यात्माचें नैतिक रूपांतर करण्याचीहि प्रथा सामान्यजनांत आहे; व या अध्यात्ममूलक नीतीचा, वर्तनाचा एक नियम या दृष्टीनें बहुमोल उपयोगहि होतो; परंतु हा नियम एक मानसिक तोडगा असतो; निःशेष आत्मसत्य आणि निःशेष जीवनसत्य यांचा कांहीं तो पूर्ण व्यावहारिक समन्वय होऊं शकत नाहीं; शिवाय या मानसिक तोडग्यानें कांहीं प्रश्न सुटतात, पण तितकेच नवे प्रश्न उत्पन्न होतात. अशा नव्या प्रश्नांपैकींच एक नैतिक प्रश्न गीतेच्या अस्तित्वाला कारण झाला आहे; या प्रश्नाचें मूळ एका संघर्षांत, एका झगड्यांत आहे––या झगड्यांत एका बाजूला एका कर्मवीराचा "धर्म" (सामाजिक कर्तव्य) आणि दुसऱ्या बाजूला त्याची नैतिक भावना उभी आहे. हा कर्मवीर एक राजपुत्र आहे, योद्धा आहे व लोकनेता आहे, एका मोठ्या क्रांतिकारक प्रसंगांतील मुख्य पुरुष आहे; स्थूल भौतिक सृष्टींत, सामान्य जीवनव्यवहारांत उत्पन्न झालेल्या झगड्यांतील एक प्रमुख नायक आहे; या झगड्यांत सत्य आणि न्याय उचलून धरणाऱ्या शक्ती एका बाजूला (आपल्या कर्मवीराच्या बाजूला) आणि

असत्य व अन्याय उचलून धरणाऱ्या शक्ती दुसऱ्या बाजूला आहेत; त्याच्या वंशाची आणि मानव वंशाचीहि नियति आमच्या कर्मवीराला हक्कानें आज्ञापीत आहे कीं, त्यानें प्रतिपक्षाला तोंड द्यावें, त्याशीं लढाई करावी, या लढाईंत भयंकर भौतिक झुंज द्यावी लागली, राक्षसी हत्या करावी लागली, तरी ती करून सत्याचें आणि न्यायाचें नवें युग, नवें साम्राज्य त्यानें स्थापन करावें. दुसऱ्या बाजूला त्याची नैतिक भावना साध्यसाधनवाद काढून त्याच्या साधनाची, त्याच्या नियोजित क्रियेची—लढाईची आणि हत्येची—निर्भर्त्सना करीत आहे; ही लढाई, ही हत्या हें पाप आहे, असें त्यास बजावीत आहे; लढाईमुळें हजारों जीवांना व्यक्तिशः यातना भोगाव्या लागतील; तत्कालीन समाजांत प्रक्षोभ, अव्यवस्था, तंटे निर्माण होतील, म्हणून त्याची नैतिक भावना मागें हटतें व त्यास बजावतें कीं, लढाईपासून आणि हत्येपासून दूर रहाणें हा एकच मार्ग त्याला मोकळा आहे; हा एकच मार्ग खऱ्या नैतिकतेला धरून आहे. आध्यात्मिक नीतिशास्त्र अहिंसेचा आग्रह धरणारें आहे; कोणालाहि इजा न पोंचविणें, कोणाचीहि हत्या न करणें, हा आध्यात्मिक वर्तनाचा सर्वश्रेष्ठ नियम आहे, असें आध्यात्मिक नीतिशास्त्र आग्रहानें प्रतिपादतें. या नीतिशास्त्राचें म्हणणें असें कीं, लढाई लढावयाचीच असेल तर ती आध्यात्मिक पातळीवरून लढावी; अर्थात् लढाईंत भाग न घेण्याची, कसल्या तरी अप्रतिकाराची 'लढाई' लढावी; किंवा केवळ आत्म-प्रतिकाराची (आत्मबलानें प्रतिकार करून) 'लढाई' लढावी. भौतिक बाह्य जगांत ही लढाई अयशस्वी झाली, अन्यायाची शक्ति यशस्वी झाली तरी, व्यक्तीला आपला सदाचारधर्म पाळल्याचें व आपल्या उदाहरणानें सर्वोत्तम आदर्श लोकांपुढें ठेवल्याचें समाधान राहील. याप्रमाणें समाजांतील कर्त्या पुरुषाला सामाजिक कर्तव्याचा धर्म एक प्रेरणा देतो व आदर्श आध्यात्मिक नीतिधर्म दुसरी प्रेरणा देतो. या दोन प्रेरणांचा संघर्ष टाळणारी तिसरी एक प्रेरणा, एक आत्यंतिक आध्यात्मिक प्रेरणा कर्त्या पुरुषाला आत्यंतिक कर्मसंन्यासाकडे वळविते. पार्थिव जीवन, या जीवनाचे सर्व हेतू, या जीवनांतील सर्व दर्जाचीं कर्में त्यानें टाकून द्यावी, आणि अशा स्वर्गीय किंवा विश्वातीत अवस्थेच्या प्राप्तीसाठीं झटावें, कीं ज्या अवस्थेंत शुद्ध आध्यात्मिक जीवन जगतां येईल—असें ही तिसरी प्रेरणा त्याला सांगते : मानवी जन्म, जीवन आणि मरण हा एक अर्थशून्य गोंधळ आहे, आभास आहे आणि त्याचा त्याग करून पलीकडील विश्वातीत स्वर्गीय अवस्था गांठण्यानेंच शुद्ध आध्यात्मिक जीवन जगतां येणार आहे, असा या तिसऱ्या प्रेरणेचा आग्रह असतो. या तीनहि प्रेरणांपैकीं कोणतीच प्रेरणा गीता अमान्य करीत नाहीं. प्रत्येक प्रेरणा विशिष्ट ठिकाणीं योग्य आहे असें गीतेचें म्हणणें आहे. सामाजिक कर्तव्य, समाजांतील व्यक्तीनें करीत असावें, सर्वसामान्य व्यवहारांत ज्या व्यक्तीला भाग घ्यावा लागतो, त्या व्यक्तीनें तिचा सामाजिक धर्म पाळला पाहिजे असा गीतेचा आग्रह आहे; सर्वश्रेष्ठ आध्यात्मिक नैतिक आदर्शाचा एक भाग अहिंसा आहे, आणि आध्यात्मिक मोक्षाचा एक मार्ग संन्याशाचा कर्मत्याग आहे हेंहि गीतेला मान्य आहे. पण गीतेचें वैशिष्टच हें आहे कीं, या तीनहि अन्योन्यविरोधी कल्पनांच्या पलीकडे मोठ्या धैर्यानें पाऊल टाकून—एकमेव दिव्य पुरुषाचा, ईश्वराचा अर्थपूर्ण आविष्कार हें जीवनांतील सर्व व्यवहारांचें स्वरूप आहे, असें सांगून ती संपूर्ण जीवनाचें समर्थन करते व असें स्पष्ट विधान करते कीं, पूर्ण मानवी कर्म आणि पूर्ण आध्यात्मिक जीवन यांत विसंवाद असण्याचें कांहींच कारण नाहीं; अनंताशीं ज्या जीवनाचें ऐक्य साधलें

आहे, सर्वोत्तम आत्मतत्त्वाशीं जें जीवन संवादी आहे, पूर्ण ईश्वरत्वाची ज्या जीवनांत अभिव्यक्ति आहे, असें पूर्ण आध्यात्मिक जीवन आणि पूर्ण मानवी कर्म एकत्र असूं शकतात, अविरोधानें एकत्र नांदूं शकतात, असें गीता सांगते.

**मानवी जीवनाची संकीर्णता––**

मानवी जीवनांत जे प्रश्न उभे राहतात, त्या सर्वांचें मूळ तीन गोष्टींत आहे. आमचें अस्तित्व संकीर्ण आहे, ही एक गोष्ट; या अस्तित्वाचें सारभूत तत्त्व स्पष्ट नाहीं, ही दुसरी गोष्ट आणि तिसरी गोष्ट ही कीं, या अस्तित्वांत जे निर्णय घेतले जातात, या अस्तित्वाचे हेतू आणि व्यवहार जे दिसतात ते ठरविणारी शक्ति आमच्यामध्यें अगदीं खोल वसत असून ती एक गूढ आहे. आमचें अस्तित्व जर एकरस असतें, तें जर केवळ भौतिक-प्राणिक, केवळ मानसिक किंवा केवळ आत्मिक असतें, किंवा त्यांत यांपैकीं एक तत्त्व प्रकट आणि बाकीचीं तत्त्वें त्यांत पूर्णतः किंवा प्रामुख्यानें अंतर्हित असें जर तें असतें, किंवा यांपैकीं एक तत्त्व प्रकट व बाकींचीं आमच्या अवचेतन अथवा अतिचेतन भागांत पूर्णपणें गुप्त, असें आमचें अस्तित्व असतें, तर आमचा गोंधळ उडविणारे प्रश्न त्यांत उभे राहिले नसते. तें केवळ भौतिक-प्राणिक असतें, तर भौतिक आणि प्राणिक नियमांनीं तें बांधलें गेलें असतें; तें केवळ मानसिक असतें, तर या शुद्ध अ-प्रतिहत मानसिक अस्तित्वाला त्याचा मानसिक व्यवहारनियम स्पष्टपणें कळला असतां; तसेंच तें केवळ आत्मिक असतें, तर त्याचा स्वयंभू आध्यात्मिक कायदा त्याला स्वयंपूर्ण करूं शकला असता. मनुष्येतर प्राण्यांना, भौतिक-प्राणिक पातळीवरील प्राण्यांना कसलेहि प्रश्न भासत नाहींत; शुद्ध मनस्तत्वाच्या लोकांत असणारा मनोमय देव कसलेहि प्रश्न उभे राहू देणार नाहीं, किंवा उभे राहिलेले सर्व प्रश्न शुद्ध मानसिक नियमांच्या आधारें चटकन् सोडवून मोकळा होईल, किंवा या प्रश्नांतून बुद्धिमान्य संवादित्वाच्या मार्गानें तो बाहेर पडेल आणि समाधानांत राहील; या नंतर शुद्ध आत्मिक अस्तित्वाचा आत्मा पाहतां, तो अनंताच्या पोटांत आत्मतुष्टपणें वावरतो आणि त्याला वरील प्रकारचे कसलेहि प्रश्न त्रास देत नाहींत हें उघड आहे; पण मनुष्याच्या अस्तित्वांत भौतिक-प्राणिक, मानसिक आणि आत्मिक हीं तीनहि तत्त्वें गूढप्रकारें एकत्र गुंफलेलीं आहेत. या तत्त्वांचें अन्योन्यांशीं खरें नातें काय आहे तें मनुष्याला अवगत नाहीं; या तत्त्वांपैकीं कोणतें तत्त्व आपल्या जीवनाचें आणि प्रकृतीचें खरेंखुरें वास्तव तत्त्व आहे तेंहि मनुष्याला कळत नाहीं, त्याच्या नियतीचा ओढा कोणत्या दिशेनें आहे, त्याच्या पूर्णतेचें स्थान कोठें आहे हेंहि मनुष्याला कळत नाहीं; म्हणूनच त्याचा गोंधळ उडविणारे अनेक प्रश्न त्याच्यापुढें उभे राहतात.

**भौतिक-प्राणिक जीवनाचें महत्त्व––**

जड-भौतिक तत्त्व आणि प्राणतत्त्व हीं दोन तत्त्वें मनुष्याच्या अस्तित्वाला पायाभूत आहेत; या पायापासून त्याच्या अस्तित्वाला आरंभ होतो, या पायावर तो उभा असतो आणि त्याला पृथ्वीवर शरीर धारण करून रहावयाचें असेल, तर त्याच्या अस्तित्वाला पायाभूत असलेल्या तत्त्वांची मागणी त्यानें पुरविलीच पाहिजे, त्या तत्त्वांचा कायदा त्यानें मानलाच पाहिजे हें उघड आहे. या तत्त्वांचा कायदा काय सांगतो? 'मनुष्यानें सर्व आपत्तींत शरीर आणि

जीव टिकवून धरला पाहिजे, अनेक भोग्यांचा हव्यास त्याला असला पाहिजे, अनेक भोग्यांवर त्याची मालकी असली पाहिजे, त्यानें आपल्या स्वत्वाचा प्रभाव दाखविला पाहिजे, त्यानें आपल्या शरीराला, प्राणाला आणि अस्मितेला––अहंकाराला––समाधान मिळेल असें वागलें पाहिजे.' मनुष्याच्या अस्तित्वाला पायाभूत असलेल्या या तत्त्वांच्या वरील मागण्या कोण-त्याहि बौद्धिक युक्तिवादाला नाकारतां येत नाहींत, किंवा या पायाचें सत्यत्वहि त्याला खोटें ठरवितां येत नाहीं; मनुष्याच्या श्रेष्ठ अंगांत नैतिक आदर्शवाद आणि आध्यात्मिक पूर्णतावाद कितीहि भरलेला असो, त्यालाहि त्याच्या भौतिक-प्राणिक पायाचें सत्यत्व खोटें ठरवितां येत नाहीं किंवा या पायाभूत तत्त्वांच्या मागण्या नाकारतां येत नाहींत. या तत्त्वांचे हेतू पूर्ण करण्यास प्रकृति मानवजातीस भाग पाडीत आहे; त्यांचे जे महत्त्वाचे प्रश्न आहेत, ते प्रश्न मानवी भवितव्याचा महत्त्वाचा आणि न्याय्य भाग आहेत असें सांगून मानवजातीनें या प्रश्नांकडे लक्ष देणें आणि ते सोडविण्याचा प्रयत्न करणें न्याय्य आणि महत्त्वाचें आहे, असा मानवाचा समज, प्रकृति आपल्या जुलमी कायद्यानें करून देत आहे,––आणि कोणताहि बौद्धिक युक्तिवाद, नैतिक आदर्शवाद, आध्यात्मिक पूर्णवाद मानवजातीच्या प्रकृतीच्या या जुलमाला तोंड देण्याचें सामर्थ्य देऊं शकत नाहीं. उलट, असें मात्र घडतें कीं, मानवाच्या वास्तव जीवनांतील निकडीचे प्रश्न सोडवू न शकणाऱ्या आध्यात्मिक, नैतिक आदर्शवादांना मानवी बुद्धि कंटाळते, आणि दुसरे अनेक प्रश्न सोडविण्याचें त्यांचें सामर्थ्य लक्षांत घेऊनहि त्यांच्याकडे पाठ फिरविते, आणि प्राणिक व भौतिक अस्तित्व एवढेंच विशेष लक्षांत घेण्या-सारखें मानवी अस्तित्व आहे असें ठरवून, हें अस्तित्व शक्य तितकें कार्यक्षम, सुसंघटित आणि सुखमय करण्याकडे आपली सहजप्रवृत्ति आणि विचारशक्ति लावते, खर्च करते. याप्रमाणें मानवानें सामर्थ्य व सत्ता यांनीं संपन्न असें जीवन जगावें, विचारशक्तीला साधेल तेवढी भौतिक आणि प्राणनिष्ठ पूर्णता संपादून सामर्थ्यपूर्ण जीवन जगावें, हा मानव जातीचा सर्वमान्य धर्म बनतो. याप्रमाणें जगण्याची इच्छा आणि सत्तेची वा सामर्थ्याची इच्छा सोडून मानवाचे ठिकाणीं इतर ज्या आकांक्षा आहेत किंवा भासतात,त्या सर्व खोटया, दांभिक समजाव्या किंवा त्यांना दुय्यम महत्त्व द्यावें, असें त्याची बुद्धि ठरवून देते.

**मानसिक वा बौद्धिक जीवन व त्याची अपूर्णता––**

परंतु भौतिक जडतत्त्व आणि प्राणतत्त्व यांनीं कितीहि चिकाटीनें आपणच महत्त्वाचीं तत्त्वें आहों असें म्हटलें व त्यांचें महत्त्व कितीहि मानलें तरी केवळ शरीर आणि प्राण हीं दोन तत्त्वें म्हणजे मनुष्य नव्हे. "मनाचे हे सेवक असून, सेवा करण्यांतच त्यांनीं समाधान मानावें; ही सेवा करण्याचा मोबदला म्हणून मनाला त्याचे खास विलास करावयास मिळतात असें समजून त्यानें संतुष्ट असावें," हा पक्षहि मनुष्य सर्वथा मान्य करूं शकत नाहीं. प्राणतत्त्व हें मूळ आणि या तत्त्वाचा विस्तार किंवा त्याचा फुलवरा म्हणजे बुद्धि (मन), हा पक्षहि मनुष्य मानूं शकत नाहीं; भौतिक जीवनाची तृप्ति झाल्या-नंतर, तीवर अवलंबून असणारी एका प्रकारची चैनबाजी म्हणजे बुद्धिविलास, हें मतहि मनुष्य मान्य करूं शकत नाहीं. मनुष्य म्हणजे शरीर आणि प्राण येवढेंच नव्हे, तर मनुष्य म्हणजे मनहि आहे; आणि शरीर व प्राण याहून मन हें मनुष्याचें आंतरिक स्वरूप असून

तें त्याला अधिक जिव्हाळ्याचें आहे; हें मन जसजसें विकास पावतें तसतसें, शरीर आणि प्राण यांना आपलें साधन बनवावयाचा तें आग्रह धरतें; मनाला कांहीं खास आत्माविष्कार करावयाचा असतो व स्वतःच्या इच्छांची तृप्ति करावयाची असते. कांहीं खास सुखद व्यवहार करावयाचा असतो आणि यासाठीं शरीर व प्राण ही जोडी त्याला साधन म्हणून आवश्यक असतें, अनिवार्य असतें. पण हें साधन त्याला पुष्कळच त्रासदायक होतें, अडचणी उत्पन्न करतें—आणि म्हणूनच मनुष्यापुढें प्रश्न उभे राहतात. मनुष्याचें मन विविध विषयांचा परामर्ष घेणारें आहे. तें केवळ भौतिक आणि प्राणिक विषयांत स्वतःला कोंडून घेत नाहीं; बुद्धीचे विषय, सौंदर्यशास्त्र, नीतिशास्त्र, भावना आणि हृदय, कर्तृत्व आणि कर्म या सर्व गोष्टींकडे मनाची स्वाभाविक ओढ असते. ज्यावेळीं यांपैकीं कोणत्याहि विषयाकडे मन वळतें, त्यावेळीं त्या विषयाचें अंतिम, सर्वश्रेष्ठ स्वरूप गांठण्याचा त्याचा स्वभाव असतो. (हाच त्याचा उच्चतम आणि ज्येष्ठ सामर्थ्याचा स्वभावगुण होय.) पण हें स्वरूप गांठण्यासाठीं मन आपला सर्व जोर लावीत असूनहि जीवनाची चौकट (प्राणयुक्त जडतत्त्व) त्याला तें सर्वांशानें हस्तगत करूं देत नाहीं, साकार करूं देत नाहीं, या भौतिक पातळीवर पूर्णांशानें वास्तवांत आणूं देत नाहीं. मनाच्या आकांक्षेचा विषय झालेलें कोणत्याहि गोष्टीचें श्रेष्ठ स्वरूप मनाला अंशतः हस्तगत होतें, मनापुढें तें प्रकाशपूर्ण, तेजोमय आदर्श म्हणून तळपत असतें; हा आदर्श मनाला आंतमध्यें अगदीं जवळ घेतां येतो. आंतमध्यें मन या आदर्शाचा आदेश आज्ञाधारकपणें पाळूं शकतें, बाह्य व्यवहारांतहि अंशतः या आदर्शाला मूर्त करूं शकतें. पण जीवनाच्या सर्व घटना तें या आदर्शानुरूप घडवूं शकत नाहीं, त्या आदर्शाच्या चौकटींत बसवूं शकत नाहीं. ज्याप्रमाणें श्रेष्ठतम बौद्धिक सत्याचा, विवेकाचा उच्चतम चरम आदेश आमच्या बौद्धिक अस्तित्वाला, जाणावासा व मानावासा वाटतो, त्याच-प्रमाणें आमचा नैतिक सदसद्विवेक हा श्रेष्ठतम न्याय आणि सदाचार हे आपले अनिवार्य साध्य मानतो; आमची हृदयाची भावनात्मक प्रकृति ही श्रेष्ठतम प्रेम, सहानुभूति, दया, एकात्मता यांचा आदेश पाळण्यासाठीं तळमळत असते; आमचा सौंदर्यवादी आत्मा, सौंदर्य आणि आनंद यांच्या सर्वोत्तम आदर्शासाठीं थरारत असतो; आमची कर्तृत्वोन्मुख इच्छाशक्ती याकरितां धडपडत असतें कीं, आमच्या अंतर्बाह्य जीवनावर तिचें पूर्ण प्रभुत्व स्थापित व्हावें आणि तिचा हुकुम सर्वत्र चालावा; याप्रमाणें आमच्या अस्तित्वाच्या निरनिराळ्या अंगांच्या धडपडी आपापल्या श्रेष्ठतम साध्यासाठीं एकाच वेळीं चालू असतात; आणि त्याबरोबर आमचें प्राणसेवक आणि देहसेवक मन असा आग्रह धरीत असतें कीं, देहयुक्त अस्तित्व सुरक्षित रहावें, त्याला आनंद लुटावयास मिळावा, भरपूर मालमत्ता या सुरक्षिततेसाठीं व आनंदा-साठीं आपल्याजवळ असावी—हेंच खरें सर्वश्रेष्ठ साध्य आहे व हाच त्याला त्याच्या आंत-रात्म्याचा आदेश आहे. मानवाची बुद्धि हा एकंदर प्रकार पाहून गोंधळून जाते. मानवाच्या कोणत्याहि अंगानें स्वतःपुरती श्रेष्ठतम मानलेली गोष्ट त्याला सर्वांशानें मिळवून देणें अशक्य असून, सर्व अंगांना त्यांचें उच्चतम उद्दिष्ट एकाचवेळीं मिळवून देणें हें तर सुतराम अशक्य आहे ही गोष्ट मानवी बुद्धि ओळखते आणि मग ती प्रत्येक अंगाचें क्षेत्र वेगळें वेगळें घेऊन त्या त्या क्षेत्रांत त्या क्षेत्रापुरता आदर्श आणि धर्म निर्माण करून ठेवते, प्रत्येक क्षेत्रांत अनेक आदर्श व अनेक धर्महि निर्माण केले जातात; आणि मग जीवनांत या आदर्शांचा,

या धर्मांचा आदेश पाळला जावा असें ती ठरवून देते, असा प्रयत्न ती करते. याप्रमाणें सत्याचे, आणि विवेकाचे, न्यायाचे आणि सदाचाराचे, सौंदर्याचे आणि आनंदाचे, प्रेमाचे, सहानुभूतीचे व एकात्मतेचे, आत्मजयाचे, आणि व्यवहारजयाचे, आत्मरक्षणाचे, मालकीचे आणि कार्यक्षम व सुखी भौतिक जीवनाचे अनेक आदर्श त्या त्या क्षेत्रांत मानवी बुद्धीनें निर्माण करून ठेवले आहेत. त्या त्या क्षेत्रांतील श्रेष्ठतम तेजोमय आदर्श आम्हां सामान्य माणसांच्या पात्रतेच्या पलीकडे फार उंचीवर असतात; क्वचित् माणसें या आदर्शाजवळ जाण्याचा, हे आदर्श आपल्या जीवनांत मोठ्या प्रमाणांत आणण्याचा यशस्वी प्रयत्न करूं शकतात; सामान्य मानवसमूह या आदर्श साध्यांहून कमी दर्जाचें साध्य, एखादा रूढ व्यवहार्य, सापेक्ष दृष्टीनें बरासा आदर्श आपल्या समोर ठेवून त्याप्रमाणें वागतात, वागत असल्याचें बोलतात. मानवी जीवनाला श्रेष्ठ आदर्शांचें आकर्षण वाटतें; पण हे आदर्श त्याला झेपत नाहींत. ते तो सोडून देतो. मानवी प्राणमय भौतिक जीवन स्वतःचें क्षुद्र अनंतत्व मोठे मानून त्याच्या बळावर मानसिक नैतिक रूढ व्यवस्था मोडून काढतें. जडाधिष्ठित प्राणतत्त्व आणि मन हीं दोन तत्त्वें मनुष्याचे ठिकाणीं एकत्र येऊन एकमेकांवर प्रभाव गाजवीत असलीं, तरी तीं एकमेकांपासून भिन्न आणि विसंवादी असल्यानें वरीलप्रमाणें मानसिक व्यवस्था कोलमडते किंवा मनाला जीवनाच्या समग्र सत्याची किल्ली सांपडली नसल्यानेंहि त्याची व्यवस्था भौतिक प्राणतत्त्व मोडून काढूं शकतें. मानवी जीवाचें मन व नैतिक अंग यांच्या पातळीच्या वरतीं अज्ञात असें जें कांहीं मनाहून श्रेष्ठ असें तत्त्व आहे त्याचे ठिकाणीं जीवनाच्या पूर्ण सत्याची गुरुकिल्ली शोधली पाहिजे.

(अपूर्ण)

—श्रीअरविंद

---

कोणत्याहि प्रकारची आसक्ति ही साधनेंतील अडथळाच आहे. तुमच्याठिकाणीं सर्वांच्यासाठीं सदिच्छा असली पाहिजे, सर्वांविषयीं आंतरिक सहृदयता असली पाहिजे; पण वासनात्मक आसक्ति मात्र असतां कामां नये.

—श्रीअरविंद

*

दुसऱ्यांच्या दोषांविषयीं फारसा विचार करूं नका. त्याचा उपयोग होत नाहीं. नेहमीं वृत्तीमध्यें शांतता व स्थिरता ठेवा.

—श्रीअरविंद.

# उद्याचळीं मित्र आला—

आज बंगाल खडबडून जागा झाला आहे.

जनगणाच्या दु:खाचा व नैराश्याचा क्रंदनध्वनि चारीं दिशांना टाहो फोडून म्हणत होता, "कुठे आहे बंगाल ? रामकृष्ण-विवेकानंदांचा बंगाल, श्रीअरविंदांचा बंगाल ? एक वेळ ज्याची ख्याति होती कीं "What Bengal thinks today India thinks tomorrow—(आज बंगाल जो विचार करतो तोच विचार सारा भारतवर्ष उद्यां करीत असतो)" तो बंगाल आज तर मरणोन्मुख झाला आहे!

खरंच का बंगाल मृत्युमुखांत चालला आहे?

नाहीं, बंगालला मृत्यू कदापिहि स्पर्श करूं शकणार नाहीं. भगवंताची व त्याच्या अंतरंग शिष्यांची लीलाभूमि म्हणून ज्या देशाची माती पवित्र झाली आहे, ज्या देशाचें हवामान दिव्यशक्तीच्या अद्भुत किरणांनीं संपृक्त झालेलें आहे, त्या देशाला जगांतली कोणतीहि शक्ति पददलित करूं शकणार नाहीं.

एकदां कोणीतरी श्रीअरविंदांना विचारलें, "दुर्भिक्ष, फाळणीच्या परिणामभूत हालअपेष्टा, बेकारी, दैन्य, दारिद्र्य यांचा शाप बंगालच्या कपाळीं काय म्हणून ?"

"नेत्याच्या अभावामुळें" श्रीअरविंद म्हणाले.

"नेत्याच्या आगमनासाठीं काय करावें ?"

"अभीप्सा, तीव्र पुकार, आवाहन."

अन् वास्तविकहि त्यांना पुनश्च नेता मिळाला आहे.

श्रीअरविंदांचे पवित्र देहावशेष बंगालच्या नवद्वीप नगरींत आज प्रतिष्ठित केले आहेत.

देहावशेष ? देहावशेष म्हटलें कीं आम्हांला काय बोध होतो ? ज्यांची देवमूर्तीप्रमाणें मंदिरांत प्रतिष्ठा करून सर्वांनीं भक्तिभावानें पूजा करावी असें कांहीं अस्थिविशेष, नखाग्रांचीं कांहीं कात्रणें आणि केसांच्या कांहीं बटा ?

होय. नखाग्रांचीं कात्रणें आणि केसांच्या बटा हें तर खरेंच, पण त्याहूनहि अधिक कांहींतरी.

काय तें ?

दधीचि ऋषींच्या तप:पूत हाडांपासूनच दुर्धर्ष असुराचा संहार करणारें वज्र निर्माण होऊं शकलें याचा आम्हांला कसा विसर पडेल ?

भगवान् बुद्धाच्या देहावशेषांच्या प्रभावानें हजार वर्षांपूर्वी संपूर्ण पूर्वार्ध भूगोल उद्भासित झाला होता याची आम्हांला विस्मृति कशी होईल ?

श्रीअरविंदांचें हे दिव्य शक्तिमय देहावशेष अव्यर्थ आहेत, त्यांच्या सिद्धीची क्षमता प्रचंड आहे, स्वयंक्रिय आहे हें भावनाप्रधान बंगाली हृदयाला कळलें. त्यामुळेंच हावडा, कलकत्ता, राणाघाट, कृष्णनगर, हालिशहर व नवद्वीप इत्यादि शहरीं जेव्हां हे देहावशेष गेले, तेव्हां लक्ष लक्ष लोकांनीं एकमुखानें जयघोष केला, लक्ष लक्ष स्त्रियांनीं आनंदातिशयानें एकमुखानें

'उलुध्वनि'* केला, लक्ष लक्ष सुवासिनींनीं घरांघरांतून, मंदिरामंदिरांतून शंख फुंकले. मृदंग, खोल, करताल व कीर्तनें यांच्या ध्वनीनें सारें वातावरण दुमदुमून गेलें; बालकांपासून वृद्धांपर्यंत सर्वांच्या आनंदाश्रूंत सारा बंगाल न्हाऊन निघाला आहे. बंगालच्या सर्वांतःकरणांतून एकच निनाद उठत आहे, "दिव्य चैतन्य नूतन रूपें फिरे एलो नदियाय"––नवद्वीपांत दिव्य चैतन्य पुनश्च परतलें आहे. नवद्वीप धन्य झालें आहे.

नवद्वीप ! मान्यवर पंडितांची पुण्यभूमि ! न्याय, वेदांत व तंत्र यांमध्यें अभूतपूर्व पारंगतता प्राप्त करून या नगरीनें न भूतो न भविष्यति अशी कामगिरी केली आहे. बंगालची ही वाराणशी आहे.

परंतु विशेषेंकरून महाप्रभू श्रीकृष्णचैतन्यांची ही जन्मभूमि व लीलाभूमि असल्यामुळें या नगरीला बंगालचें वृंदावन म्हणून एक आगळेंच महत्त्व प्राप्त झालें आहे. लक्षावधि वैष्णवभक्तांचा मेळावा प्रत्येक पर्वणीला येथें भरत असतो. या पुण्यपावन नवद्वीपांतून संन्यास घेऊन ज्या मार्गानें गौरांग महाप्रभू पांचशें वर्षांपूर्वी निघून गेले होते, त्याच मार्गानें युगावतार श्रीअरविन्द आपल्या प्रिय बंगालमध्यें परतले आहेत.

म्हणूनच आम्हीं म्हटलें––

आज बंगाल खडबडून जागा झाला आहे.

श्रीअरविंदांचे पवित्र देहावशेष आज बंगालच्या नवद्वीप नगरींत प्रतिष्ठित केले गेले आहेत.

बंगालला पुनश्च त्यांचा नेता मिळाला आहे.

'दिव्य चैतन्य नूतन रूपें फिरे एलो नदियाय.'

श्रीअरविंदांच्या शक्तीचें कार्य इतक्या गुप्तपणें चालतें कीं, त्याची सूक्ष्मगति साधारणाला दृष्टिगोचर होऊंच शकत नाहीं. अकस्मात् त्याचें फळ दृष्टोत्पत्तीस येतें, एक दिवस समस्त अंधःकार ज्योतिर्मय होऊन जातो, शबरीची प्रतीक्षा सार्थक झालेली दिसून येते.

आज सुवर्णरथांतून श्रीअरविंदांचे देहावशेष घेऊन दोन मैल लांबीची प्रचंड मिरवणूक कलकत्त्याच्या राजपथांवरून चालली असतांना आकाशांतून वज्रध्वनि प्रकटत आहे––

"I know I have the strength in me to save this fallen race.
God sent me upon earth with this great mission to fulfil."

(या पतित जातीचा उद्धार करण्याचें सामर्थ्य माझ्यांत आहे याची मला जाणीव आहे ! या महान् कार्याची पूर्तता करण्यासाठींच भगवंतानें मला पृथ्वीवर पाठविलें आहे.)

आज भारतवासी या उच्चतम महत्तम प्रकाशाला कशा रीतीनें व किती प्रमाणांत ग्रहण करतो यावरच भारतवर्षाचें भवितव्य अवलंबून आहे असें म्हणतां येईल. कारण ज्या ज्या वेळीं नव्या युगाचा संदेश घेऊन अनंताचे अग्रदूत पृथ्वीवर येतात, त्या त्या वेळीं त्यांची अवहेलना करावयाची मानवप्रकृतीला संवयच लागली आहे. जुन्याच व पूर्वपरिचित अंधःकाराला किंवा संधिप्रकाशालाच चिकटून बसल्यामुळें या नवचैतन्याला संशयबुद्धीनें प्रश्न केला जातो–

काय आहे तुझ्यांत नवीन असें ? तूं जें सांगतोस तें तर जुनेंच आहे. तुझीं कवनें, तुझा स्वरझंकार सर्वकांहीं जुनेंच आहे, आमच्या संतांनीं सांगितलेला, आमच्या पूर्वजांनीं गायिलेला.

---

*जयध्वनीचा एक लोकप्रिय बंगाली प्रघात

याचसाठीं येशू ख्रिस्ताला सुळावर चढविण्यांत आले.

याचसाठीं जॉन द आर्कला जिवंत जाळण्यांत आलें.

याचसाठीं ज्ञानेश्वर, तुकाराम, गौरांगमहाप्रभू, रामकृष्ण-विवेकानंद इत्यादि सर्वच महापुरुषांना हालअपेष्टांशीं सतत झगडावें लागलें आहे.

श्रीअरविंदांचे देहावशेष २१ फेब्रुवारी १९५९ ला दुपारीं दोन वाजतां नवद्वीप येथील सुंदर मंदिरांत प्रतिष्ठित करण्याचा अपरूप सोहळा झाला. त्या निमित्तानें श्रीमाताजींनी जो संदेश दिला तो याचाच द्योतक नाहीं काय ?

श्रीमाताजी म्हणाल्या :—

In the eternity of becoming each Avatar is only the announcer, the forerunner of a more perfect future realisation.

And yet men have always the tendency to deify the Avatar of the past in opposition to the Avatar of the future.

Now again Sri Aurobindo has come announcing to the world the realisation of tomorrow ; and again his message meets with the same opposition as of all those who preceded him.

But tomorrow will prove the truth of what he revealed and his work will be done.

21-2-1959 THE MOTHER

(भवतीच्या चिरंतन प्रवाहांत प्रत्येक अवतार हा भविष्यकालीन पूर्णतर अनुभूतींचा केवळ उद्गाता असतो; तो असतो केवळ एक अग्रगामी संदेशवाहक.

परंतु कालच्या अवतारालाच दिव्यतेचीं लेणीं लेववून त्याला उद्यांच्या अवताराच्या विरोधांत उभे करण्याची मनुष्यमात्राची नेहमींची प्रवृत्ति आहे.

उद्यांच्या अनुभूतीची जगाला घोषणा करण्यासाठीं आज पुनः श्रीअरविंद आलेले आहेत; आणि त्यांच्या मागें होऊन गेलेल्या सर्व अवतारांप्रमाणेंच यांना देखील विरोधितेशीं मुकाबला करावा लागत आहे.

परंतु त्यांनी जें कांहीं व्यक्त केलेलें आहे, त्याची सत्यता आगामीकाल सिद्ध करून दाखवील आणि त्यांचें कार्य पूर्ण झालेलेंच दिसेल.) CWMCE : Vol 13 : Page 22

भारताच्या पूर्व किनाऱ्यावरील हा सूर्योदय म्हणजे अतिमानस चेतनेच्या नव्या युगाचा प्रारंभ ठरेल. या मंगलप्रभाती आनंदाच्या ललकाऱ्यांनी विजयाच्या दुंदुभींतून विश्ववाणी म्हणत आहे—

'उदयाचळीं मित्र आला !'

—गजराज

# सुव्यवस्था

(विद्यार्थ्यांसाठीं)

प्राचीन काळांतील आर्य लोक विश्वाच्या मुळाशीं असलेल्या व्यवस्थेचें वर्णन अतिशय सुंदर रीतीनें करीत असत. आपण ज्या पृथ्वीवर रहातो त्यास ते 'जंबुद्विप' म्हणत असत. त्यांची अशी समजूत होती कीं, हें द्वीप क्षारसमुद्रानें वेढलेलें आहे. त्याच्याभोंवतीं पुनः जमीन आहेच; ती क्षीरसागरानें वेढलेली आहे. त्याहि पलीकडे प्रत्येक जमिनीभोवतीं अनुक्रमें लोणी, दही, दारु आणि साखर यांच्या समुद्रांचीं वलयें आहेत. शेवटचें सातवें वलय शुद्ध पाण्याच्या सागराचें असून तो सागर सर्वांत गोड आहे.

आजकाल शाळांतून आपण जे जगाचे नकाशे वापरतो त्यांत तुम्हांला मधसागर, दूध-सागर किंवा यांपैकीं दुसरा कोणताच समुद्र आढळणार नाहीं ! अर्थात् हे समुद्र अगदीं खरे-खुरे आहेत असें कांहीं प्राचीन आर्य मानीत नव्हते. एक गूढ कल्पना व्यक्त करणारें तें एक केवळ रूपक होतें.

या परंपरागत कल्पनेंतून इतर गोष्टींबरोबरच हेंहि सत्य सूचित करावयाचें आहे कीं, "या जगांतील प्रत्येक वस्तु व्यवस्थितरीतीनें तिच्या योग्य जागीं ठेवली पाहिजे. जोपर्यंत तशी ती योग्य जागीं ठेवलेली नाहीं, तोपर्यंत या पृथ्वीवर शांति नांदणार नाहीं व सुखाचें जीवन जगतां येणार नाहीं." दूध, दही, मीठ तसेंच मदिरा, शर्करा आणि पाणी यांसारख्या उत्तम वस्तू वेगवेगळ्या न ठेवतां त्यांचा गोतमकाला केला तर त्याची काय चव होईल कल्पना करा.

★

आपले सर्व धर्मग्रंथ या व्यवस्थेविषयीं सांगतात. फक्त त्यांनीं योजलेल्या रूपकांचें स्वरूप वेगवेगळें असतें एवढेंच.

यहुदी लोकांच्या धर्मग्रंथांत सृष्टीच्या उत्पत्तीची अशी कथा सांगितली आहे——

सुरुवातीला सगळीकडे केवळ सांवळा गोंधळ होता. सर्वव्यापी अंधाराचें आणि अस्ता-व्यस्ततेचें राज्य होतें. काळोखानें कोंदून गेलेल्या अस्वच्छ गुहेंत पाऊल टाकतांना मनुष्यानें दिव्याचा उजेड पाडावा, त्याप्रमाणें त्या अंधारावर परमेश्वरानें प्रकाशाचा झोत टाकला.

बायबलमधील कथांवरून असें दिसतें कीं, यानंतर त्या अवस्थेंतून दिवसानुदिवस हळुंहळुं सर्व वस्तू व्यवस्थितरूपानें व्यक्त होऊं लागल्या आणि अखेरीस मानवाची निर्मिति झाली.

माणसाचें महत्त्व यांतच आहे कीं, त्यानें सुव्यवस्था निर्माण करून ती सर्वत्र प्रस्थापित केली.

खगोल-शास्त्रज्ञ ग्रह-नक्षत्रांचें निरीक्षण करून आकाशाचा नकाशा काढतात. ग्रह-गोलांच्या परिभ्रमणाचा अभ्यास करून, त्यांना निरनिराळीं नांवें देतात आणि सूर्याभोंवतीं फिरणाऱ्या ग्रहांच्या गतींचें गणित करून सूर्य आणि पृथ्वी यांच्यामध्यें आलेल्या चंद्राला

केव्हां ग्रहण लागेल याचें भाकीत करूं शकतात. ज्योतिर्विद्या ही अशा रीतीनें व्यवस्थेच्या तत्त्वावर आधारलेली आहे.

गणित-शास्त्राचीहि कांहीं विशिष्ट पद्धति आहे. अगदीं लहानपणींहि मुलांना ओळीनें पाढे म्हणायला आवडतें. हातांचीं बोटें किंवा गोटया मोजतांना एक, पांच, तीन, दहा,दोन असे कसेतरी आंकडे मोजणें यांत कांहीं अर्थ नाहीं, हें मुलाच्या लवकरच लक्षांत येतें आणि तो एक-दोन-तीन-चार असें क्रमानें मोजूं लागतो. याच्यांतूनच पुढील साऱ्या गणित-शास्त्राची इमारत उभी रहाते.

हेंच सुव्यवस्थेचें तत्त्व आकर्षक संगीत-शास्त्रामागें नसतें, तर त्या सुंदर कलेची काय स्थिति झाली असती ?

संगीताचे सा-रे-ग-म-प-ध-नी हे सात स्वर एकाद्या क्रमानें वाजविले तर सुंदर सुरेल संगीत निर्माण होईल. पण एकदमच सर्व स्वरांची सरभेसळ करून सोडली, तर मात्र केवळ कर्णकटू कल्लोळच उत्पन्न होईल. विशिष्ट क्रमानें सूर वाजविल्यानेंच कुशल वादनकार सुरेलता निर्माण करूं शकतो. तसेंच सा-ग-प-सा हे स्वर एकदम वाजविण्यानें निघालेल्या आवाजाला 'पूर्ण-स्वर' म्हणतात. सर्व संगीतकला सुद्धां अशारीतीनें एका विशेष अनुक्रमावरच आधारलेली आहे.

मानव-निर्मित सर्व कलांचें व सकल शास्त्रांचें मूळ सुसंगतींत-सुव्यवस्थेंतच आहे असें आपणांस आढळून येईल.

★

पण अशीच व्यवस्था इतर बाबतींतहि असणें आगत्याचें नाहीं कां? अशी कल्पना करा कीं, तुम्ही एका घरांत गेलां आहांत. तेथील सर्व वस्तू इकडे तिकडे अस्ताव्यस्तपणें पसरल्या आहेत, सर्व सामान वेडेंवांकडें-आडवें-तिडवें पडलेलें आहे, त्याच्यावर खंडीभर धूळ सांठली आहे. तें पाहिलेंत कीं तुम्ही म्हणाल,—'काय हा अजागळपणा, किती ही धूळ नि केरकचरा !' कारण धूळ किंवा कचरा असणें म्हणजेहि एक अव्यवस्थेचाच प्रकार नव्हे कां ? होय. या जगांत धुळीला सुद्धां स्थान आहेच. पण म्हणजे तें तुमच्या सामानावर मात्र नव्हे.

त्याचप्रमाणें शाईची जागा दौतींत. सतरंजीवर आणि तुमच्या बोटांवर नाहीं.

जागच्याजागीं ठेवलेली कुठलीहि वस्तु स्वच्छ नि सुंदर दिसते. शाळेंत तुमच्या पुस्तकांसाठीं आणि घरांत तुमच्या कपडयांसाठीं किंवा खेळण्याच्या वस्तूंसाठीं स्वतंत्र जागा ठरलेली असावी. त्या जागीं त्या त्या वस्तूशिवाय दुसरी कोणतीच वस्तु असतां कामां नये. नाहींतर या बाबतींत तुमचीं भांडणें होतील. तुमचीं पुस्तकें फाटतील, कपडे किटतील, खेळाचें सामान तुटून-फुटून जाईल. कारण त्या पसरलेल्या बाजारांतून पाहिजे ती वस्तु हुडकून काढणें आणि पुन: नीट ठेवणें म्हणजे मोठ्या त्रासाचें नि जिकीरीचेंच काम आहे. पण जर वस्तू जागच्या जागीं ठेवल्यात तर तेंच काम किती हलकें होईल !

माणसाचें अवघें आयुष्य नि त्याचीं सर्व कामें, तसेंच देशाची संपत्ति आणि सुबत्ता हें सर्व कांहीं व्यवस्थेच्या तत्त्वावर अवलंबून आहे. म्हणूनच कोणत्याहि देशाच्या सरकारचें

पहिलें कर्तव्य असतें, राष्ट्रांत कायदा नि सुव्यवस्था राखणें. त्यासाठीं सम्राट, राजा किंवा राष्ट्रपतींपासून थेट अगदीं सामान्य सरकारी नोकरापर्यंत सर्वांनींच जास्तींत जास्त झटणें आवश्यक असतें. त्याचप्रमाणें प्रत्येक नागरिकानें–मग तो कोणतें का काम करीत असेना––ही व्यवस्था राखण्यांत मदतच करायला हवी. कारण याच पद्धतीनें प्रत्येक व्यक्ति आपला देश समृद्ध आणि समर्थ करूं शकेल.

जरा विचार करा, व्यवस्थेंत एवढासा बिघाड झाल्यानें सुद्धां केवढे अनर्थ ओढवतात ! अखिल राष्ट्रांतील असंख्य आगगाडचा अगदीं नेमलेल्या मिनिटाला येऊन, ठरल्याप्रमाणें पुढें जाण्यासाठीं आणि वाटेंत कधीं अपघात होऊं नयेत यासाठीं स्टेशनावरील सर्व कामगार, पहारेकरी, ड्रायव्हर, किंवा सिग्नल दाखविणारा मनुष्य या सर्वांनींच अगदीं नीट लक्ष देऊन प्रत्येक काम वेळेवर करायला पाहिजे. दुर्दैवानें किंवा दुर्लक्षानें या व्यवस्थेंत एकाद्या निमिषाचा जरी फरक पडला तरी केवढे अनर्थकारक अपघात घडतील ! एकादी गाडी थोडी उशीरा आली तरी तेवढचानें किती घोंटाळा होतो––दिलेल्या भेटीच्या वेळा चुकतात; अधिकारी, कामगार किंवा व्यापारी लोकांना आपआपल्या कामावर हजर होण्यास उशीर होतो; पुढें बोटीनें प्रवास करणारांची बोट चुकते. खरें सांगायचें तर उशीरामुळें काय काय अनर्थ ओढवतील याची पुरी कल्पनाच करतां येणार नाहीं.

सृष्टींतील सुव्यवस्था आणि नियमितपणाहि एकाएकीं नाहींसा झाला तर ? काय अनवस्था प्रसंग निर्माण होईल याचा विचार केला आहांत कां तुम्ही ?

वक्तशीरपणाचें सर्वांत उत्कृष्ट उदाहरण म्हणजे घडचाळ. तेंच जर आपला कांटेकोर वक्तशीरपणा सोडून कधींकधीं धांवत तर कधीं रखडत चालायला लागलें, तर दिवसभर कामाची काय परवड होईल हें तुम्ही कल्पनेनें सहज समजूं शकाल. घडचाळ दुरुस्त करूनहि नीट चालेनासें झालें तर तें टाकूनच द्यावें लागेल.

*

एका शेतकऱ्याच्या घरांत एका खोलींत वडिलोपार्जित असें एक फारच जुनें पुराणें घडचाळ होतें. उणींपुरीं दीडशें वर्षें त्यानें त्या घरांतील सर्वांना आपला अगदीं तालबद्ध असा खात्रीचा 'टिक् टिक्' ठेका ऐकविला होता, एका क्षणचीहि उसंत न घेतां !

रोज सकाळीं उजाडतांच तो शेतकरी त्या घडचाळाजवळ येऊन तें नीट चालतें आहे ना, हें पहात असे.

एके दिवशीं सकाळीं उजाडतांच, तो शेतकरी त्या खोलींत येतांच तें घडचाळ त्याला म्हणूं लागलें,"दीडशें वर्षें लोटलीं. अतिशय नियमितपणें अचूक वेळ सांगण्याचें काम मी अखंडपणें बजावतो आहे. आतां मी जरा थकलो आहे. तेव्हां टिक् टिक् करणें बंद करून आराम करावा असें म्हणतो ! मी म्हणतो त्यांत तथ्य आहे ना ?"

"घडचाळ दादा ! तुमचें हें म्हणणें कांहीं तितकेंसें खरें नाहीं. आहो, प्रत्येकवेळीं टिक् टिक् करतांना मधल्या वेळांत क्षणाक्षणाची विश्रांति तुम्हांला मिळत असतेच, हें तुम्ही विसरलात वाटतें ?" चतुर शेतकऱ्यानें उत्तर दिलें.

क्षणभर विचार करून घडचाळानें पुन्हां मुकाटचानें काम करण्यास सुरुवात केली.

मुलांनों, या कथेंत काय सुचवावयाचें आहे? कोणतेंहि काम व्यवस्थितपणें व पद्धतशीर रीतीनें केलें तर, ज्या प्रमाणांत थकवा आला असेल त्या प्रमाणांत विश्रांतीहि मिळते आणि वक्तशीरपणा व नियमितपणा पाळला असतां कितीतरी कष्ट आणि सायास वांचतात.

★

सर्व गोष्टींमध्यें योग्य सुसूत्रता असेल, तर कार्यक्षमता व शक्ति वाढते. ज्या यंत्रांतील प्रत्येक दांत, तरफ आणि इतरहि भाग आपापलें काम नीट व व्यवस्थित करत असतील, तेंच यंत्र सर्वांत विशेष कार्यक्षम नसतें कां? अशा यंत्रांत गतिनियमनाचें काम करणाऱ्या मोठ्या चक्राएवढीच, अचूक ठिकाणीं बसविलेल्या लहानग्या स्क्रूचीसुद्धां, किंमत नाहीं काय?

अर्थात् या विश्वाच्या विशाल विस्ताराचाच एक भाग असणाऱ्या आपल्या शाळेच्या किंवा घराच्या व्यवस्थेसाठीं लक्ष देऊन काम करणारा मुलगा विश्वव्यवस्थेच्या कामासहि हातभार लावतो, हें ओघानेंच आलें.

सुरुवातीला व्यवस्थितपणाची संवय लावून घेणें जरा कठीण जाईल हें खरें; पण कष्ट घेतल्याशिवाय कोणतीच गोष्ट शिकतां येत नाहीं. पोहणें, वल्हवणें किंवा व्यायाम करावयास शिकणें हेंहि सोपें नाहीं. पण कांहीं काळ संवय केल्यानें सर्व कांहीं करतां येतें.

ह्याच पद्धतीनें हळूंहळूं व्यवस्थितपणाची संवय लावून घेऊन सर्व कांहीं अगदीं सहजपणें नीटनेटकें करतां येतें व त्यावेळीं अव्यवस्थितपणा नावडेनासा होतो, त्रासदायक वाटूं लागतो.

तुम्ही जेव्हां प्रथम चालावयास शिकलांत तेव्हां, तुमचा पावलोंपावलीं तोल गेला असेल, कितीदां तरी तुम्ही पडला असाल, कित्येकदां तुम्हांला लागलें असेल आणि अनेकदां तुम्हांला रडूं कोसळलें असेल. आतां तुम्ही सहज, कांहीं विचार न करतां चालूं शकतां. चालतांना आणि पळतांना तुमची होणारी हालचाल म्हणजे, तुमची मज्जासंस्था, तुमचे स्नायू आणि सर्व अवयव यांच्या आश्चर्यकारक व्यवस्थितपणाचें एक उत्कृष्ट उदाहरणच आहे.

अशा रीतीनें प्रयत्न केला, तर व्यवस्थितपणा हा आपला स्वभावच बनून जातो.

असें मात्र मुळींच समजूं नका कीं, तुम्ही नियमित, व्यवस्थित आणि वक्तशीर झालांत म्हणजे तुम्हीं हंसतां कामा नये किंवा आनंदी रहातां कामां नये.

हें सिद्ध करण्यासाठीं जरा तुम्हांला हंसायला लावून ही गोष्ट पुरी करूं.

वक्तशीरपणाचा हा नमुना पहा. मात्र त्याचें अनुकरण करण्यासाठीं तो नाहीं हं.

एका अरबी बाईजवळ एक नोकर होता. चूल पेटविण्यास निखारा मागण्यासाठीं तिनें त्याला शेजारच्या घरीं पाठविलें. तो जात असतां त्याला ईजिप्तच्या प्रवासाला निघालेल्या लोकांची एक गाडी दिसली. त्यांतील प्रवाशांशीं बोलतां बोलतां त्यांच्याच बरोबर प्रवासाला जाण्याचें त्यानें ठरविलें. एक वर्षभर त्यानें प्रवासहि केला.

तो जेव्हां परत आला तेव्हां, शेजारच्या घरीं विस्तव आणण्यासाठीं गेला. पेटते निखारे घेऊन येत असतांना वाटेंत तो पाय घसरून पडला. सारे निखारे खालीं पडून विझून गेले, तेव्हां कुठें त्याचे डोळे उघडले आणि तो म्हणूं लागला—'खरेंच घाई केली म्हणजे फारच त्रास होतो हं.'

—श्रीमाताजी

CWMCE : Vol 02 : Page 226-230

# मातृवाणी

(मागील अंकावरून पुढें)

**"स्वप्नांत ज्यांची गांठ पडते व ओळख होते त्यांची नंतर बाह्य जगांतहि गांठ पडते व ओळख होते, हें कसें घडतें?"**

मानसिक आणि भावनात्मक जगांतील साधर्म्यामुळें कांहीं कांहीं लोक एकमेकांकडे आकर्षिले जातात. पृथ्वीवर गांठ पडण्याच्या आधीं या जगतांच्या पातळीवर त्यांची बहुधा गांठ पडत असते. त्या जगामध्यें एकत्र येणें, संभाषण करणें आणि पृथ्वीवर शक्य असलेले सारे मानवी संबंध राखणें या गोष्टी शक्य असतात. कांहींना हे संबंध ठाऊक असतात, कांहींना नसतात. कांहीं, किंवा बहुतेक लोकांना या आंतरिक जीवनाची आणि आंतरिक व्यवहाराची, या देवाण-घेवाणीची जाणीव नसते. तरी देखील ज्यावेळीं बाह्य जगांत एकादी नवीन व्यक्ति त्यांना भेटते, त्यावेळीं ती अति परिचित, अगदीं चांगली माहितीची असल्याचा त्यांना अनुभव येतो.

★

**"खोटीं अशीं दृश्यें** ( Visions ) **नसतातच कां?"**

ज्यांचें बाह्य रूप खोटें आहे अशीं दृष्यें असतात. आम्ही येशू ख्रिस्ताला पाहिलें असें सांगणारीं शेंकडों, हजारों माणसें आढळतात. त्यांच्यापैकीं ज्यांना येशूचें खरोखर प्रत्यक्ष दर्शन घडलें आहे अशीं कदाचित् दहाबारा देखील माणसें असणार नाहींत आणि त्यांच्या त्या पाहण्याबाबत सुद्धां बरेच विवरणात्मक बोलावें लागेल. इतरांनीं जें पाहिलेलें असेल तें म्हणजे येशूची एकादी विभूति असण्याचा संभव आहे. अथवा तो एकादा विचार किंवा मनाच्या स्मृतींत राहून गेलेली एकादी कल्पनादेखील असण्याचा संभव आहे. त्यांपैकीं अशाहि कांहीं व्यक्ति आढळतात कीं, ज्यांची येशूवर अढळ श्रद्धा असते आणि त्यांना एकाद्या शक्तीचें किंवा सत्तेचें किंवा एखाद्या स्मृत-मूर्तीचें दर्शन होत असतें; आणि तें अत्यंत तेजोमय व त्यांच्या मनावर खोल ठसा उमटविणारें असतें. त्यांनीं जें कांहीं पाहिलेलें असतें, तें दुसऱ्या कोठल्यातरी जगतांतील किंवा अतिमानसिक पातळीवरील आहे अशी त्यांची भावना असते आणि त्या त्या दृश्यांनीं त्यांच्या ठिकाणीं भीति, धाक किंवा आनंद अशी कांहीं भावना निर्माण होऊन बसलेली असते. अशा व्यक्तींचा येशूवर विश्वास असल्यानें, दृश्य दिसतें त्यावेळीं त्यांच्या मनांत त्याच्याशिवाय दुसरें तिसरें कांहीं येणें शक्यच नसतें व त्यामुळें आपल्याला येशूचें दर्शन झालें असें ते म्हणतात. पण ह्याच दृश्याचा किंवा ह्याच अनुभवाचा प्रत्यय हिंदु, मुसलमान किंवा आणखी एकाद्या धर्मावर विश्वास असलेल्या व्यक्तीस वेगळ्या नाम-रूपानें येईल. पाहिलेली किंवा अनुभवलेली वस्तु मुळांत एकच असूं शकेल पण आकलन करणाऱ्या मनाच्या भिन्न भिन्न पिंडानुरूप त्याला निरनिराळें स्वरूप दिलें जातें. विश्वास, धर्मश्रद्धा,

पुराण-कथा, परंपरा यांच्या अतीत जे कोणी गेलेले असतील, त्यांना मात्र हें दर्शन म्हणजे वास्तविक काय आहे हें सांगतां येतें. पण अशा व्यक्ती फारच थोडया, अगदीं विरळाच असतात. तेव्हां, जें काय पाहिलें असेल तें बरोबर समजण्यासाठीं मनानें रचलेल्या प्रत्येक कल्पनेपासून तुम्हीं मुक्त असायला हवें; केवळ देश-काल-विशिष्ट असें जें कांहीं असेल तें सारें झुगारून द्यायला हवें.

आध्यात्मिक अनुभूति म्हणजे स्वतःच्या अंतरीं भगवंताशीं संयोग होणें; (किंवा बाह्य जगांतांतहि; कारण आध्यात्मिक क्षेत्रांत या दोन्हीं गोष्टी एकच असतात.) आणि कोणत्याहि देशांत, कोणत्याहि जमातींत, इतकेंच नव्हे तर कोणत्याहि युगांत हा आध्यात्मिक अनुभव सारख्याच प्रकारचा असतो. भगवंताचें दर्शन सर्व काळ आणि सर्व ठिकाणीं एकाच पद्धतीनें व्हावयाचें. या बाबतींत जो वेगळेपणा भासतो त्याचें कारण, प्रत्यक्ष अनुभव व तो व्यक्त करण्याची पद्धति यांमध्यें जणुं एक मोठी दरी असते. जी प्रत्यक्ष आध्यात्मिक अनुभूति घडते ती नेहमीं आंतरिक चेतनेमध्यें—आंतरिक जाणीवेमध्यें. ती तुमच्या बाह्य जाणीवेमध्यें प्रतिबिंबित होते व नंतर तुमचें शिक्षण, तुमची श्रद्धा, तुमच्या मनाचे पूर्वसंस्कार यांना अनुसरून तिला कांहीं एक निश्चित स्वरूप दिलें जातें. सत्य हें केवळ एकच आहे; सद्वस्तु ही एकच आहे, पण ती ज्या रूपांद्वारां व्यक्त केली जाते ते आकार व आविष्कार मात्र अनेक असतात.

★

### " 'जोन ऑफ आर्क' ला जीं दृश्यें दिसत, त्यांचें स्वरूप काय ?"

ज्याला आपण देवलोक म्हणतो (किंवा कॅथालिक संप्रदायाचे अनुयायी ज्याला संतलोक म्हणतात—अर्थात् हे दोन्हीं अगदीं एक नाहींत.) तेथें वास्तव्य करणाऱ्या कांहींशीं जोन ऑफ आर्कचा संबंध होता हें उघड आहे. तिथें तिला ज्या व्यक्ती भेटत असत, त्यांना ती 'देवदूत श्रेष्ठ' ( archangles ) म्हणत असे. अशा प्रकारचे देवदूत हे उच्चतर मानसलोक (Highermind) आणि अतिमानस किंवा विज्ञान लोक (Supermind) यांच्या मधील जगतांत वास्तव्य करीत असतात. श्रीअरविंद या लोकाला 'अधिमानस' ( Overmind ) लोक म्हणतात. अधिमानस जगत् हे निर्मात्यांचें, आकार व रूप देणारांचे जगत् होय.

जे दोन श्रेष्ठ देवदूत 'जोन ऑफ आर्कला' नेहमीं भेटत व तिच्याशीं बोलत, त्यांचे दर्शन जर का एकाद्या भारतीयाला झाले असतें, तर तें त्याला अगदींच वेगळ्या रूपांत दिसलें असतें. कारण, जेव्हां कोणाला दृश्य दिसतें, तेव्हां त्याचें मन त्याच्या कल्पनेप्रमाणें त्या दृश्याला आकार देत असतें. जें पहाण्याची तुमच्या मनाला अपेक्षा असते, तीनुसार पाहिलेल्या दृश्याला रूप दिलें जातें. ख्रिस्ती, बौद्ध, हिंदू व जपानी धर्माचे लोक जेथें एकत्र बसले आहेत, अशा ठिकाणीं त्यांना जर दृष्टांतामध्यें एकाच वेळीं तीच व्यक्ति दिसली तर, तिला ते अगदींच भिन्न भिन्न नांवें देतील. दृष्टांतांत पाहिलेली व्यक्ति अमुक अमुक सारखी आहे असें त्याच संदर्भात प्रत्येक जण वेगळें वेगळें वर्णन करील; तथापि दृष्टांतांत दिसलेली व्यक्ति म्हणजे वास्तविक एकच आविष्कार असेल. ज्या दर्शनास दिव्य आद्य मातेचें दर्शन असें भारतांत म्हटलें जाईल, नेमक्या त्याच दर्शनास कॅथालिक लोक व्हर्जिन

मेरीचें दर्शन म्हणतील; तर जपानी लोक मानतील कीं, हें दयेची देवता 'क्वानोन' हिचें दर्शन आहे. आणखी दुसरे कांहीं लोक तेंच दर्शन दुसऱ्या एकाद्या नांवानें ओळखतील. मुळांत शक्ति एकच, सत्ता एकच पण धर्मा-धर्मानुसार तिच्या प्रतिमा मात्र वेगवेगळ्या प्रकारच्या बनल्या आहेत.

★

**"समर्पणाच्या मार्गांत अभ्यास (Training) किंवा तपस्या यांचें स्थान कोणतें ? जर एखाद्यानें समर्पण केलें तर त्याला तपस्या न करतां राहतां येणार नाहीं कां ? समर्पणाच्या कार्यांत तपस्या कधीं कधीं आडच येत नाहीं काय ?"**

तसा संभव असूं शकतो. तथापि तपस्या किंवा विकास करण्याची पद्धति आणि संकल्पपूर्वक कृति यांमध्यें फरक केला पाहिजे. तपस्या ही वेगळी गोष्ट आहे. मी बोलत आहे तें संकल्पपूर्वक कृतीसंबंधीं. तुम्हांला समर्पण करावयाचें असेल, तर प्रयास करणें सोडून दिलें पाहिजे. तरीपण, संकल्पपूर्वक कर्महि करावयाचें सोडून द्यावयाचें असा याचा अर्थ नाहीं. उलट भगवदिच्छेशीं तुमची संकल्पशक्ति सुसंवादी ठेवून, तिच्यामध्यें तुमची इच्छा मिसळून तुम्हांस तुमची ध्येयसिद्धी जलद घडवून आणतां येईल. हेंहि एकप्रकारचें समर्पण आहे. तुमच्याकडून काष्ठलोष्ठवत् निष्क्रिय समर्पणाची अपेक्षा नाहीं, तर तुमची संकल्पशक्ति तुम्ही भगवदिच्छेच्या हातीं देण्याचा प्रयत्न करावा ही तुमच्याकडून अपेक्षा आहे.

★

**"प्रथम भगवंताशीं साधकाचा संयोग घडून आल्याखेरीज हें करणें कसें शक्य आहे ?"**

तुम्हांस संकल्पशक्ति तर आहेच; ती तुम्ही अर्पण करूं शकतां. रात्रीं झोंपेंतहि सावध राहण्याचेंच उदाहरण घेऊं या. याबाबत तुम्हीं जर निष्क्रिय समर्पणाची भूमिका घेतली, तर तुम्ही म्हणाल, "मला रात्रीं झोंपेंत सावध राहतां यावें अशी जर परमेश्वराची इच्छा असेल, तर मी आपाआपच सावध राहीन." या उलट तुम्ही आपली संकल्पशक्ति जर भगवंतास अर्पण कराल तर तुम्ही स्वतः संकल्प करायला सुरुवात कराल आणि म्हणाल, "झोंपेंतहि मी सावध राहीन." हें व्हायला पाहिजे, असा तुमचा संकल्प असल्यानें तुम्ही वाट पहात स्वस्थ बसणार नाहीं. आतां यामध्यें जेव्हां समर्पणाची वृत्ति येईल, त्यावेळीं तुम्ही अशी भूमिका घ्याल आणि म्हणाल, "माझी संकल्पशक्ति मी भगवंतास अर्पण करीत आहे. माझी अशी उत्कट इच्छा आहे कीं, मला झोंपेंतहि भान राखतां यावें; पण मला त्याचें ज्ञान नाहीं. म्हणून भगवदिच्छेनें माझ्यासाठीं तें घडून येवो." तुम्हांला तुमचा संकल्प सतत कायम राखतां आला पाहिजे. एखाद्या विशिष्ट कृतीची निवड करून अथवा एखाद्या विशिष्ट कृतीची मागणी करून नव्हे, तर जें अन्तिम फल साध्य करून घ्यावयाचें आहे त्यावर आपली उत्कट अभीप्सा केंद्रित करून, त्या स्वरूपांत तुमचा संकल्प सतत टिकविण्याचा प्रयत्न तुम्हीं केला पाहिजे. ही झाली पहिली पायरी. तुम्ही जर जागरूक असाल, तुमचें चित्त जर सावध असेल तर नेमकें काय करायला हवें यासंबंधीं कांहींतरी निश्चित प्रेरणा स्फूर्तीच्या रूपानें तुम्हांला मिळेल;

आणि मग त्याप्रमाणें लगेच तुम्हीं काम करायला लागलें पाहिजे. मात्र तुम्हीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, समर्पण करणें याचा अर्थ, तुमच्या कृतीचा जो कांहीं परिणाम होईल तो तुम्ही स्वीकारावयाचा, मग तो परिणाम तुमच्या अपेक्षेहून कितीहि कां वेगळा असेना. याच्या उलट, जर तुमचें समर्पण निष्क्रिय असेल, तर तुम्ही इकडची काडी तिकडे करणार नाहीं, कसलाहि प्रयत्न करून पाहणार नाहीं; केवळ बिछान्यावर जाऊन पडाल व काय चमत्कार घडून येत आहे याची वाट पहात बसाल.

आतां, तुमचा संकल्प किंवा इच्छा भगवदिच्छेशीं सुसंवादी आहे कीं नाहीं, हें कसें पहावयाचें ? तुम्हीं आंत जाऊन शोधलें पाहिजे, पाहिलें पाहिजे कीं, तुमच्या संकल्पाला वा इच्छेला कांहीं उत्तर मिळतें कां नाहीं, तुमच्या संकल्पाला कांहीं आधार वाटतो कां विरोध वाटतो ? मात्र मन-प्राण-शरीर यांच्या साह्यानें हें पहावयाचें नाहीं, तर तुमच्या अंतरंगांत खोल, हृदयस्थ असें जें कांहीं नित्यनिरंतर विराजमान् आहे, त्याच्या साह्यानें हें जाणून घ्यावयास पाहिजे.

★

**"ध्यानासाठीं अधिक अधिक प्रयत्न करण्याची जरूरी नाहीं काय ? जितके अधिक तास ध्यान करावें तितकी अधिक प्रगति होते, हें खरें नाहीं काय ?"**

किती काळ ध्यानार्थ वेंचला हें आध्यात्मिक प्रगतीचें मोजमाप नाहीं. तुमच्या प्रगतीचें खरें माप हें कीं, ज्यावेळीं तुम्हांला ध्यान करायला मुळींच प्रयत्न करावे लागत नाहींत, त्या-वेळीं उलट ध्यान थांबविण्यालाच तुम्हांला प्रयास पडतात; ध्यान थांबवणें कठीण होऊन जातें; भगवंताविषयींचा विचार बंद करणें अशक्य होऊन बसतें; सामान्य जाणीवेच्या भूमि-केवर खालीं येणेंच मुष्कील होऊन जातें. भगवंतावर एकाग्रता करणें, ही जेव्हां तुमच्या जीविताची एक आवश्यकता होईल, त्यावांचून तुमचें जेव्हां चालणारच नाहीं; कोणताहि उद्योग करतांना जेव्हां तुमची ही स्थिति स्वाभाविकपणेंच रात्रंदिवस चालू राहील, तेव्हां तुम्हीं निश्चित प्रगति केली आहे, खरोखरी तुमची प्रगति होत आहे असें समजा. तुम्ही ध्यानासाठीं बसा अथवा इकडे तिकडे हिंडा किंवा कामकाज करीत रहा, तुमच्याकडून कशाची अपेक्षा असेल तर ती म्हणजे जाणीवेची, जागृतीची. एकमेव आवश्यकता हीच आहे; भग-वंताचें अखंड अनुसंधान—अखंड भान राखणें.

★

**"पण, बसून ध्यान करणें ही एक अत्यावश्यक साधना नाहीं काय ? आणि अशा साधनेनें भगवंताशीं अधिक उत्कट नि गाढ संयोग घडून येत नाहीं काय ?"**

—श्रीमाताजी

(अपूर्ण)

CWMCE : Vol 03 : Pages 16-20

# साधना आणि मानवीसंबंध

(श्रीअरविंदांचीं पत्रें)

मानवी अज्ञानमय भावनाधिष्ठित स्वभावाचा एक भाग म्हणजे या क्रिया, वृत्ती, आहेत. मानव व्यक्तींना परस्परांविषयीं जें प्रेम वाटतें, तें सुद्धां बहुतेक वेळां अहंकारी भावनांचें व वासनामय असें प्रेम असतें; आणि हक्क, अधिकार, द्वेष, अभिमान, क्रोध इत्यादि भावना, विकार हे अशा प्रेमाचे नेहमींचे साथीदार असतात. योगामध्यें त्यांना स्थान नाहीं. त्याच प्रमाणें खऱ्या आंतरात्मिक किंवा दिव्य प्रेमामध्येंहि त्यांना स्थान नाहीं. योगामध्यें तुमचें सारें प्रेम भगवंताकडे वळलेलें असलें पाहिजे; मनुष्य किंवा अन्य प्राणी यांविषयीं सुद्धां तीं परमेश्वरी शक्तीचीं वाहनें म्हणूनच प्रेम वाटलें पाहिजे––अभिमान किंवा अन्य भावना यांना त्यामध्यें स्थान असतां कामा नये. 23 SABCL : Page 810

★

मानवी जीवनांत सामान्य भावनामय जीवनाचें अंग म्हणून जे संबंध असतात, त्यांना आध्यात्मिक जीवनांत कांहीं महत्त्व नाहीं. उलट ते प्रगतीमध्यें अडथळाच आणणारे असतात. कारण मन आणि प्राणतत्त्वसुद्धां संपूर्णतया भगवन्ताभिमुख झालें पाहिजे. आध्यात्मिक चेतनेमध्यें प्रवेश करून सर्व कांहीं या नवीन आध्यात्मिक पायावर आधारावयाचें हें तर साधनेचें उद्दिष्ट आहे; आणि जेव्हां एखाद्याला भगवंताशीं संपूर्ण तादात्म्य प्राप्त झालें असेल तेव्हांच केवळ, अशी आध्यात्मिक पायावर उभारणी करणें शक्य आहे. हें झालें नाहीं तोंवरच्या मध्यंतरींच्या काळांत सर्वांविषयीं सुस्थिर अशी सद्भावना राखली पाहिजे. परंतु वासना-भावनांवर आधारलेल्या संबंधांचा तसा विशेष उपयोग होत नाहींच; कारण त्यांच्यामुळें वासना-भावनांच्या या खालच्या पातळीवरच आपली जाणीव खिळली जाते; आणि हे संबंध जाणिवेला उच्चतर पातळीवर नेण्याला अडथळाच करतात.

★ SABCL 23 : Page 811

कौटुंबिक बंधनांविषयीं तुम्हीं जें लिहिलें आहे, तें सर्वस्वीं बरोबर आहे. अनावश्यक अशी देवाण-घेवाण त्यानें निर्माण होते आणि भगवंताकडे संपूर्णपणें वळण्याच्या आड ती गोष्ट येते. योगसाधना सुरुं केल्यानंतर आपले संबंध हे, शारीरिक रक्तसंबंध आणि केवळ भौतिक जाणिवेला परिचित झालेल्या संवयी यांवर अवलंबून राहणें या गोष्टी कमी कमी होत गेल्या पाहिजेत. साधनेच्या पायावर ते अधिकाधिक आधारलेले असले पाहिजेत. व्यावहारिक पद्धतीनें किंवा पूर्वींच्याच जुन्या दृष्टिकोणांतून या मानवी नात्यांकडे न पाहतां, एका साधकाचा दुसऱ्या साधकांशीं जसा संबंध असतो त्याप्रमाणें किंवा एकाच मार्गावरून प्रवास करणारे आपण अनेक आत्मे आहोंत किंवा एकाच जगन्मातेचीं लेंकरें आहोंत या भावनेवर आपले संबंध आधारलेले असावेत. 23 SABCL : Page 812

★

भगवंताविषयींचें प्रेम जसजसें वाढत जातें, तसतसा इतर गोष्टींचा त्रास मनाला होईनासा होतो.

★ 23 SABCL : Page 813

भगवंताशीं तादात्म्य पावल्याचा आंतरिक अनुभव आल्यानेंच केवळ आंतरिक 'एकलेपणा' घालवितां येईल. कोणत्याहि मानवी संगतीनें हा रितेपणा भरून निघणार नाहीं. त्याचप्रमाणें आध्यात्मिक जीवनाकरितां दुसऱ्या व्यक्तींशीं लागणारी सुसंवादिता ही कोणत्याहि मानसिक किंवा भावनात्मक संबंधावर आधारलेली असतां कामां नये; तर उलट दिव्यचेतना आणि भगवंताशीं एकत्व हा त्याचा आधार असला पाहिजे. जेव्हां भगवंताचा, आणि भगवंतामध्येंच इतर सर्व व्यक्ती वसत आहेत या गोष्टीचा अनुभव एकाद्याला येतो, त्यावेळींच खरा सुसंवाद निर्माण होतो. तोंपर्यंत केवळ सदिच्छा असेल किंवा ध्येयाच्या समानतेच्या भावनेवर आधारलेली एकता आणि आपण सर्व दिव्यमातेचीं बालकें आहोंत ही भावना असूं शकेल. . . . . खरा सुसंवाद हा केवळ आंतरात्मिक किंवा आध्यात्मिक पायावरच येऊं शकेल. 23 SABCL : Page 814

★

केवळ भगवंतासह 'एकटें' राहतां येणें ही अवस्था म्हणजे साधकाच्या दृष्टीनें सर्वांत विशेष भाग्याची गोष्ट आहे; कारण अशा अवस्थेंतच आंतरिक दृष्टीनें तो भगवंताच्या अत्यंत सन्निध येतो आणि हृदयाच्या गाभाऱ्यांत त्याचबरोबर विश्वमंदिरांत साऱ्या चराचराशीं सख्यभाव अनुभवूं शकतो. शिवाय सर्वांशीं खऱ्या रीतीनें एकरूप होण्याची तीच सुरुवात आणि तोच पाया आहे; कारण ही एकता भक्कम पायावर भगवत्-अनुभूतीच्या खऱ्या आधारावर प्रस्थापित झालेली असते. या ठिकाणीं साधक भगवंतामध्यें सर्वांना भेटतो, त्यांच्याशीं एकरूप होतो; मानसिक आणि भावनात्मक अहंकाराच्या पराधीन आदान-प्रदानाच्या द्वारां नव्हे. म्हणून एकांताला, अकेलेपणाला भिऊं तर नकाच; उलट श्रीमातेवर विश्वास ठेवा आणि तिच्या सामर्थ्यानें व कृपाबलानें ध्येयपथावर अग्रेसर व्हा.

★ 23 SABCL : Page 814

साधकाचें प्रेम भगवंतावर असलें पाहिजे; हें जेव्हां त्याला पूर्णपणें साधेल, त्याचवेळीं फक्त तो दुसऱ्यांच्यावर यथोचित व योग्यरीतीनें प्रेम करूं शकेल.

★ 23 SABCL : Page 814

हीं नातीं—परस्परसंबंध—चांगलीं किंवा वाईट आहेत असें सर्वसामान्य विधान करतां येणार नाहीं. व्यक्ति, तिच्यावर होणारे त्यांचें परिणाम आणि इतरहि कित्येक गोष्टी यांवर तें अवलंबून राहील. सर्वसामान्य नियम म्हणून असें सांगतां येईल कीं, या सर्व संबंधांचें, आपल्या जुन्या स्वभावासहित भगवंताला समर्पण केलें पाहिजे; म्हणजे मग भगवंताच्या सत्याशीं जुळणारें जें कांहीं असेल तें ठेवलें जाईल व तुमच्यामध्यें भगवत्सत्याला जे काय कार्य करावयाचें आहे, त्यासाठीं त्याचें रूपांतर केलें जाईल. दुसऱ्यांशीं असलेले सर्व संबंध हे भगवंताशीं असलेल्या संबंधाप्रमाणें असले पाहिजेत. आपल्या जुन्या वैयक्तिक जीवनाचे ते संबंध नसावेत. 23 SABCL : Page 815

—श्रीअरविंद

# श्रीअरविंद वाङ्मय

(लेखांक तिसरा)

## योग व त्याचें उद्दिष्ट

१

योग तर अनेक प्रकारचे आहेत. प्रत्येक योगाचीं साधनेंहि स्वतंत्र व वेगवेगळीं आहेत. शारीर-संस्थेवर कांहीं योग आधारलेले असतात, तर कांहीं प्राणशक्तीच्या प्रेरणेवर. दुसऱ्या कांहींना भावनात्मक आणि मानसिक शक्ती पायाभूत असतात; आणखी दुसऱ्या कांहींमध्यें, प्रत्येक योगांतील कांहीं साधनें घेऊन त्यांतून एक समन्वयात्मक पद्धति बसविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. परंतु सर्वसाधारणपणें पाहतां, त्या सर्वांचें एकच प्रधान उद्दिष्ट असलेलें स्पष्ट दिसतें. शरीर आणि प्राण यांच्या सामान्य बंधनांच्या पलीकडे, त्यांतून उच्चतर अशा निर्वाण स्थितीपर्यंत आपल्या अस्तित्वाची पातळी उंचावून, शेवटीं मुक्ती मिळविणें हें त्या सर्वांचें उद्दिष्ट असतें. पण या पुस्तकांत ज्या योगासंबंधीं श्रीअरविंद विवेचन करतात तो योग वेगळ्या प्रकारचा आहे. इतर योगांहून उद्दिष्टाच्या व साधनामार्गाच्या दृष्टीनेंहि हा योग विशेष वेगळा आहे. या योगाचें उद्दिष्ट **'मुक्ति'** हें नाहीं; तर **'संपत्ति'**-म्हणजेच **'परिपूर्ति'** हें आहे. पण कशाची पूर्ति या योगास अभिप्रेत आहे? विश्वोत्पत्तीमागें परमेश्वराचा जो संकल्प आहे त्याची परिपूर्ति; पण हा संकल्प तरी कोणता?

भगवंतानें विशेष उद्देशानें आपणां स्वतःमधूनच हें विश्व जणुं विणलें आहे. या विश्वरूपांत स्वतःचा—स्वतःच्या **सत्-चित्-आनंद** या मूळ एकरूप अविच्छिन्न अवस्थेचा आविष्कार करावयाचा, हाच तो विशेष उद्देश. अज्ञान, बंधन आणि मृत्यु यांपासून मानवी जीवन मुक्त करून, त्याचें ज्ञानपूर्ण, अनंत, अमर अशा दिव्य स्वभावांत रूपांतर करून त्या द्वारां हा परमेश्वराचा सर्वोच्च संकल्प परिपूर्ण करावयाचा हें आमच्या या योगाचें उद्दिष्ट आहे. केवळ मन अथवा केवळ आत्मा नव्हे, तर मानवाचीं सर्वच अंगें घेऊन त्यांच्यामध्यें हा परिवर्तनकारी बदल घडवून आणावयाचा आहे. याच एकमेव उद्दिष्ट-प्राप्तीच्या दृष्टीनें मानवाच्या सर्वच्या सर्व वृत्ती व शक्ती कामास लावावयाच्या आहेत. आमच्या या पूर्णयोगाचीं हीं साधनें आहेत व हें उद्दिष्ट आहे. याला पूर्णयोग अथवा सर्वांगीण मार्ग म्हणण्याचें कारण, या मार्गांत संपूर्ण मानव-जीवन व परिणामतः अखिल जीवनच सर्वांगांनीं समाविष्ट केलेलें आहे. अर्थातच संपूर्ण रूपांतराचें हें उद्दिष्ट मानवी प्रयत्नांच्या आंवाक्याबाहेरचें आहे. ज्या महाशक्तीनें या विश्वचक्राला प्रथम गति दिली तीच शक्ति केवळ हें उद्दिष्ट यशस्वी रीतीनें पूर्णतेस नेऊं शकेल.

आमच्या योगाचें वरील उद्दिष्ट ध्यानीं धरतां, **वैयक्तिक मुक्ति**, हें त्याचें अंतिम उद्दिष्ट ठरूं शकत नाहीं हें स्पष्ट आहे. अर्थात् मुक्ति ही अवस्था अत्यावश्यक असली तरी,

आपल्या मार्गावरील एक महत्त्वाची व अटळ अशी एक पायरी एवढेंच तिचें महत्त्व आहे. कारण अज्ञानाधिष्ठित मानवी प्रकृतीच्या गुणत्रयीचें वर्चस्व नाहींसें केल्याशिवाय, ती अवस्था ओलांडल्याशिवाय प्रकृतीचें सर्वांगीण, दिव्य परिवर्तन कसें शक्य होईल ?

२

या योगाच्या साधकाला पहिल्या प्रथम एक सत्य समजलें पाहिजे कीं, सर्व कांहीं वास्तविक एकच एक परब्रह्म आहे. अस्तित्वाच्या सर्व अवस्था व कोटी यांमध्येंहि तेंच व्यापून उरलें आहे. प्रत्येक प्राण्यांत, वस्तुजातांत, अवकाशांतील प्रत्येक बिंदूंत व कालाच्या प्रत्येक क्षणांशांतहि त्याचेंच वास्तव्य आहे. या सर्वांना निर्व्यक्तिकपणें '**सदात्मन्**' या रूपांत आधार देणारेंहि परब्रह्मच आहे. या निर्व्यक्तिक, निराकार आत्म्याच्या हृदयीं सर्व नामरूपात्मक अस्तित्व नांदत आहे.

निर्व्यक्तिक दिव्य सत्तेच्या साक्षात्कारानंतर साधकास अशीहि अनुभूति येतें कीं, वस्तुजातास पोटांत सामावून घेणारा व त्यांना आधार देणारा परमेश्वर वा परब्रह्म हेंच त्याच्याद्वारांहि स्वतःच व्यक्त होत राहिलेलें आहे. हा सर्व त्याचाच स्वतःचा आविष्कार आहे. अखिल वस्तुजातच त्याच्या पोटीं वसत आहे हें जसें खरें, तसेंच प्रत्येक वस्तूच्याहि पोटीं त्याचीच वसती आहे. त्याच्याचमुळें नामरूपांना अस्तित्व व सत्यत्वहि येतें.

यानंतर ओघानेंच आणखी एका अनुभूतीचा लाभ साधकास होतो : या सर्व अस्तित्वाच्या बाहेर, पलीकडे परात्पर अनंत दिव्य पुरुषोत्तमाचें अस्तित्व स्वतंत्रपणें आहे. नामरूपात्मक जगत् व त्याला आधार देणारा निर्व्यक्तिक आत्मा या दोहोंच्याहि पलीकडे हा दिव्य पुरुषोत्तम असतो. त्यानेंच स्वतःच्या अनंतत्वांतून या विश्वास निर्मिलेलें आहे; व त्याच्या आविष्काराची लीला चालली असतांना, त्या क्रीडेचें अध्यक्षपदहि त्यानेंच स्वतःकडे घेतलेलें असतें. ही अंतिम अनुभूति आल्यानंतर साधकाच्या दृष्टीला अखिल जगताच्या अस्तित्वाचा रंगच पालटून गेलेला दिसतो. त्याला हें जगत् म्हणजे संग्राम-क्षेत्र वाटत नाहीं. हें जगत् म्हणजे प्रकाश, आनंद व सौंदर्य यांच्या लाटांनीं लहरणारा दिव्य पुरुषाचा वैविध्यपूर्ण आत्मविस्तार असून पूर्वींच्या जीवनांत हेच प्रकाश, सौंदर्य व आनंद इत्यादि गुण, आपणांस त्यांच्या अगदीं विरुद्ध भासत होतें, याचा साधकाला साक्षात्कार होतो. सृष्टींत भासणारें विभिन्नत्व हें त्याच्याच पासून किरणांप्रमाणें सर्वत्र फेंकलें गेलें असून, उत्सर्ग पावलें असून, त्याच्याच मध्यें साधकास इतर सर्वांशीं असलेलें स्वतःचें एकरूपत्व अनुभवास येते. तोच सर्व अस्तित्वाचा स्वामी असून त्याच्याच अधिराज्याखालीं, छत्राखालीं आपण नांदत आहों अशी सततची जाणीव साधकाच्या ठिकाणीं सुप्रतिष्ठित व्हावयाची असते. स्वतःचें जीवन-कार्य परिपूर्ण करण्यासाठीं याच दिव्य पुरुषाच्या हातीं साधकानें स्वतःस देऊन टाकावयाचें असतें.

तुम्हांला मार्गदर्शक गुरू लाभला असेल, तर त्याच्या सर्वसमर्थ हातीं तुमच्या जीवनाचीं सारीं सूत्रें देऊन त्यालाच तुम्ही स्वतःचें संपूर्णपणें समर्पण करून टाका. हें समर्पण मात्र समग्र असलें पाहिजे. समग्र म्हणजे मनामध्यें, हृदयामध्यें, नव्हे तुमच्या शरीराच्या अणूंतहि कोठेंहि कांहींहि राखून ठेवलेलें असतां कामा नये. पवित्र आहुति दिल्याप्रमाणें तुमचें

सर्वस्व प्रभुचरणीं दान करून टाकणें ही गोष्ट थोड्या अवधींत साध्य होणारी नाहीं हें खरें आहे. तरीपण समर्पणाचा अंतःकरणपूर्वक '**संकल्प**' करून, विशिष्ट भूमिका सतत राखून, आपल्या अस्तित्वाच्या सर्व अंगांकडून समर्पण करवून घेण्याचें धोरण ठेवून साधक या मार्गाच्या प्रवासाला प्रारंभ करूं शकतो. कोणतीहि अस्पष्ट सुद्धां अहंकारप्रेरित मागणी किंवा कोणत्याहि रूपांतील वैयक्तिक आवडनावड यांनीं या समर्पणाचें पावित्र्य कलंकित होऊं देतां कामां नये. द्वैताच्या आधारावरील सर्व भेदभाव विसरून, अखिल अस्तित्व हें एकमेव भगवंताचा आविष्कार आहे, हें जाणून त्यास सर्वांगांनीं आलिंगिलें पाहिजे. याप्रमाणें मार्गदर्शक शक्तीच्या हातीं तुम्ही स्वतःस संपूर्णपणें देऊं शकलांत, तर भगवंताची लीला तुमच्या द्वारां व तुम्हांमध्यें अनिर्बंधपणें होऊं लागेल.

हें केल्यानंतर मग ठराविक स्वरूपाची कुठली स्वतंत्र **क्रिया**, **कर्मकांड** अथवा साधनाभ्यास करण्याची आवश्यकता रहात नाहीं. कारण या समर्पणाचा परिणाम म्हणून साधकाची साधना, ती शक्तीच आपल्या हातीं घेऊन त्याचा योग पूर्णतेस नेते. सर्व जबाबदारी तिनेंच घेतलेली असते. तसेंच पाहिलें तर, या महाशक्तीच्या कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् शक्तीच्या मानानें आपण मानव स्वप्रयत्नानें असें काय साध्य करूं शकणार !

एकदां हें परमेश्वराला प्राथमिक समर्पण केल्यानंतर पुढचें पाऊल म्हणजे अलिप्त राहून आपल्यामध्यें चाललेल्या त्याच्या शक्तीच्या कार्याचें निरीक्षण करावयाचें. कारण ह्या शक्तीचें कार्य अति गुंतागुंतीचें व मनाला गोंधळांत पाडणारें असतें. एकाद्या रचनेस ती सुरुवात करते; नंतर पाहावें तों कार्याचा तो धागा तसाच सोडून दुसरीच कांहीं रचना अथवा स्वभावांतील जुने संस्कार नष्ट करण्याचें कार्य ती करीत असलेली दिसते; तिच्या या कार्याचें आकलन होणें कुशाग्र बुद्धीलासुद्धां कुंठित करणारें ठरतें. म्हणून ह्या उच्चतर शक्तीची ज्ञानवत्ता व तिच्याच कार्याचा होणारा अंतिम विजय याविषयीं साधकाकडून पूर्ण श्रद्धाभाव अपेक्षित आहे. साधकाचे ठिकाणीं आंतरिक रीत्या अथवा त्याच्या बाह्य जीवनामध्यें प्रकटपणें जें जें काय ही महाशक्ति करीत असतें व घडवीत असतें, तें सर्व त्या परात्पर परमेश्वराच्या संतोषार्थ **यज्ञ** म्हणून ; आणि त्यामध्यें साधकाची भूमिका असते **यजमानाची**. 'यजमान' ह्या दृष्टीनें या यज्ञांत तो '**आधार**' बनतो, यज्ञ उत्तरोत्तर प्रगत होत आहे हें पहात राहतो व त्याचें जें कांहीं फल येईल तें चाखतो. कर्ता म्हणून त्या क्रियेमध्यें तो गुंतत नसल्यानें आपल्या 'आधाराचें' खरें स्वरूप व अधिकार-क्षेत्र त्यास कळून येतें. स्वतःच्या ठिकाणीं वास करणाऱ्या दिव्य अंशाच्या, आतापर्यंत अज्ञात असलेल्या वसतिस्थानाची, या साधनेच्या प्रभावानें साधकास जाणीव होते. त्यामध्यें ज्ञाननिधि व आनंदसागर हेलावत असतात. त्यांच्या प्रकाशलहरी त्याच्यामध्यें शिरून त्याच्या जीवन-विकास कार्यांत जी मदत करीत असतात त्यांना वाव कसा द्यावयाचा हें तो शिकतो.

३

पूर्णयोगाच्या साधनेच्या दिशा व अंगें अनेक आहेत. पण प्रथमचाच अति प्रभावी असा साधनेचा प्रारंभ परमेश्वरास सर्व-कर्मफल-समर्पणापासून होतो. सर्व कर्मांच्या फलाचा त्याग

करावयाचा म्हणजे काय करावयाचें ? कर्म करतांना विशिष्ट फलाची अपेक्षा ठेवून तें करावयाचें नाहीं. जें **'कर्तव्य कर्म'** म्हणून परमेश्वराकडून अभावितपणें समोर चालून आलें असेल, तें, त्याच्या परिणामाचा वा फलाचा विचार न करतां करावयाचें. जें कांहीं फल येणार तें, परमेश्वराच्या ज्ञानदृष्टीनें, आपणांस योग्य असणारच या श्रद्धेनें, कर्माचें आलेलें कोणतेंहि फल स्वीकारावयाचें. नंतर, कर्मफलाबरोबरच प्रत्यक्ष कर्महि परमेश्वरास समर्पित करून टाकावयाचें असतें. तुम्ही स्वतः कर्ते नसून, परमेश्वराची कार्यकारिणी शक्ति जी प्रकृति, तीच तुम्हांमध्यें व तुम्हांकरवीं परमेश्वराच्या आज्ञेनुसार सर्व कर्में घडवीत आहे ह्याचा अनुभव तुम्हांस त्यामुळें येतो. तुमच्या स्वभावद्वारां काय कर्म घडावयाचें तें परमेश्वराकडूनच निश्चित केलें जातें; आणि त्याबरहुकुम सर्व घडवून आणणारी ती प्रकृति असते. तुमच्या अंतःकरणांत हें सत्य एकदां कां खोलवर ठसलें म्हणजे मग कर्म अथवा कर्मफल यांपैकीं कशाचेंच बंधन तुम्हांला उरणार नाहीं. या ज्ञानाप्रत कसें पोंचावयाचें याचे तीन टप्पे श्रीअरविंदांनीं सांगितलेले आहेत.

प्रथम, जेव्हां तुम्ही कोणत्याहि कर्माचा संकल्प हा तुमच्या अस्तित्वाच्या स्वामीवर सोंपवून, त्याच्या प्रेरणेनुसार कर्म करूं लागतां तो पहिला टप्पा.

सर्वच प्राणिमात्राच्या हृदयीं परमेश्वर वसत असून आपल्या त्रिगुणमयी मायेकडून त्यांची हालचाल तो करवीत आहे, या श्रद्धेनें स्वतःच्या कर्माकडे पाहून तुमची जेव्हां खात्री होते कीं, हांतून घडणाऱ्या कोणत्याहि कर्माचा कर्ता आपण नसून आपणांमधील त्रिगुणाची यंत्रणाच आपणांकडून हें सर्व घडवून आणीत आहे; ही दृढभावना होणें हा दुसरा टप्पा.

नंतर, या त्रिगुणांच्या अतीत, वर, स्वतःच्या ठिकाणच्या दिव्य अंशावर स्थिर होऊन तुम्ही राहतां व त्यानंतर हळुंहळुं तुमची प्रकृतिसुद्धां त्रिगुणांच्या यांत्रिक जीवन--रहाटींतून विमुक्त होते. या तिसऱ्या अवस्थेंत त्रिगुणांमध्येंहि रूपांतर घडूं लागतें. सत्त्वगुणाचें रूपांतर शुद्ध प्रकाशमान् ज्योतीमध्यें होतें. तमोगुणाचें असीम शांतीमध्यें परिवर्तन होतें. रजोगुण, दैवी सामर्थ्याचें रूप धारण करतो. या नवीन सुसंवादमय अशा अवस्थेंत जें जें कांहीं घडेल तें, 'पुरुषाची' इच्छा परमेश्वराच्या इच्छेशीं एकरूप होऊन झालेला पूर्ण निर्दोष असा आविष्कार असेल. एक विशाल व सामर्थ्यसंपन्न शक्ति तुमचे जीवनव्यापार चालवीत असलेली तुमच्या ध्यानीं येईल. तुमचें मन, हृदय व शरीरहि तिच्या हातांतील साधन बनून जाईल; तुम्ही स्वतः म्हणजे परमेश्वरी इच्छेचें एक शक्तिकेंद्र होऊन रहाल.

ज्या 'स्पृहे' मुळें वस्तूंविषयीं वासना व आसक्ति निर्माण होते, ती **'स्पृहा'** नाहींशी होणें; ज्या द्वंद्वांमुळें वस्तूंविषयीं प्रेम वा द्वेष, आकर्षण वा जुगुप्सा यांचे ठसे उमटविले जातात, त्या **'द्वंद्वांचा लय'** होणें; वस्तूंशीं खोटेंच आत्मैक्य मानल्यामुळें वस्तूंचें दास्यत्व स्वीकारावयास भाग पाडणाऱ्या **'अहंकारास'** नामशेष करणें; ह्या गोष्टीं घडल्याशिवाय त्रिगुणांपासून मुक्ति लाभणें अशक्य आहे. सत्त्व, रज, तम या तीनहि गुणांच्या कार्यांत स्पृहा, द्वैतभाव व अहंकार यांचा बराचसा हात असतो. त्यांतल्या त्यांत सत्वगुणानें घेतलेलीं नानारूपें अत्यंत फसवीं असून तीं जणु आत्मसमर्पणाचे शत्रूच असतात.

स्वतःच्या तालबद्ध गतीनें, दिव्यशक्ति हें कार्य प्रत्येक व्यक्तीच्या भिन्नतेप्रमाणें व गरजेप्रमाणें वेगवेगळ्या पद्धतीनें करीत असतें. अविचल श्रद्धा ठेवून जागरूक प्रयत्नसातत्यानें

योगशक्तीच्या कार्यास निरंतर संमति व सतत स्मरण या गोष्टींची फक्त साधकाकडून अपेक्षा असते. कारण मार्ग बराच दीर्घ आहे व ध्येय उच्चतम आहे. उत्क्रांतीच्या मार्गानें ज्याला शतकानुशतकें लागतील असें कार्य, गति वाढवून कांहीं वर्षांच्या योगसाधनेनें प्राप्त करून घ्यावयाचें, सामान्य मानवी प्रकृतीचें संपूर्ण रूपांतर घडवून तिला सर्वांगांनीं दिव्य बनवावयाचें; हें आपलें ध्येय आहे. अर्थात् तुमच्या पंगु व वामनमूर्ति इच्छासामर्थ्यानें व प्रयत्नानें काय होणार? हें महान् कार्य कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् महाशक्तीनें हातीं घेतलेलें असून, किती कां काळ लागेना, साधकाच्या प्रकृतीमध्यें किती कां अपूर्णता असेनात, आपणासमोरील उद्दिष्ट ती साध्य करणारच करणार, यांत संशयच नाहीं. सर्व भार येथें परमेश्वरावर आहे. चांचपडत चालणाऱ्या अल्पशक्ति मानवाप्रमाणें मात्र परमेश्वराच्या कार्यांत कधीं अपयश येणार नाहीं हें निश्चित आहे.

या योगाच्या **सिद्धीसाठीं** चार साधनें पाहिजेत--

**शास्त्र--'सर्वं खलु इदं ब्रह्म'** ही शिकवण आणि सर्वेश्वरास **आत्मसमर्पण.**

**उत्साह**--अखंड अनुसंधान व ईशशक्तीच्या कार्यास निरंतर संमति देऊन मार्गक्रमण करण्याची उत्कंठा.

**गुरु**--प्रत्यक्ष परमेश्वरच किंवा शिष्यासाठीं परमेश्वरानेंच घेतलेलें व्यक्त रूप.

**काल**--योगेश्वरानें आपल्या सर्वज्ञ बुद्धिमत्तेनें कालचक्रामध्यें जी घटिका योजली असेल ती.

--मा० पुं० पंडित.

---

# नागपूर प्रकरण आणि खरी एकता.

(नागपूरला काँग्रेसचें ६४ वें अधिवेशन नुकतेंच पार पडलें. १९०७ मध्येंहि नागपूरला काँग्रेसचें अधिवेशन भरविण्याचा असाच योग आला होता. पण नेमस्तांच्या कारवायीमुळें तो फसला. जी स्वागत-समिति अध्यक्ष निवडीत असे, त्या समितींत त्यावेळीं जहाल राष्ट्रीय पक्षाचे बहुमत होतें. म्हणून नेमस्तांनीं एक नवीनच स्वागत-समिति बोलाविली. नेमस्तांच्या या वर्तणुकीनें नागपूरची जनता, विशेषतः विद्यार्थि फारच संतापले व त्यांनीं दंगा करून ही सभा पार उधळून लावली. म्हणून नागपूरचें हें अधिवेशन सुरतला हालविण्यांत आले. हीच ती इतिहास-प्रसिद्ध सुरतची काँग्रेस. या नागपूर-सुरत प्रकरणानंतर जहाल-मवाळांतील वितुष्ट विकोपाला गेलें आणि आजच्या सारखीच त्यावेळीं एकतेची हाकाटी सुरु झाली. खरी एकता म्हणजे काय याविषयींचें श्रीअरविंदांनीं त्यावेळीं, म्हणजे सुमारें ५० वर्षांपूर्वी केलेलें हें विवरण वाचकांना आजहि मार्गदर्शक व चिंतनीय वाटेल अशी आशा आहे.)

"सध्यां जिथें तिथें लोक जहालांच्या पाठीस लागले आहेत. कारण काय, तर नेमस्तांशीं मिळून मिसळून काम करणें त्यांना जमलें नाहीं म्हणून. 'Indian Social Reformer' या, जहालांच्या एका कट्टर विरोधी मुखपत्रानें, ही फूट पडण्याचें जें कारण उघडकीस आणलें आहे, तें वाचून कुठल्याहि सरळ विचारी माणसाची अशी खात्री होईल कीं, जहालांच्या दूष्य समजल्या गेलेल्या वर्तणुकीबद्दल त्यांचा धिक्कार सर्वत्र भरपूर प्रमाणांत केला

गेला आहे. कार्यकारी मंडळांत जहालांचें बहुमत होतें; ही परिस्थिति बदलविण्यासाठीं स्वागत-समितीची एक नवीन बैठक भरविण्याची नेमस्तांची खटपट चालूं होती. त्यांच्या ह्या नियमबाह्य कृत्यामुळेंच पुढील अप्रिय घटना घडून आली. सध्यां सर्वत्र ऐकूं येत असलेल्या 'जहालांची गुंडगिरी' या उघड उघड अतिशयोक्तिपूर्ण आरडाओरडीमुळें सत्य वस्तुस्थिति काय आहे हें समजणें बरेंच कठीण होऊन बसलें आहे. नेमस्तांची नेहमींचीच ही पद्धत आहे कीं, सर्व गोष्टी आपल्या मनाप्रमाणें करून वर त्याबद्दल आपल्या विरोधीपक्षाची बदनामी करायची व आपापसांतील फूट व मतभेद यास सर्वस्वीं त्यांना जबाबदार धरायचें. याहि प्रसंगीं ते असेच करीत असावेत, असा आम्हांला संशय येत आहे. पण मग हे सुरुवातीपासूनच रोखठोक मार्गाचा अवलंब कां करीत नाहींत? वास्तविक पाहतां, पुरोगामी राजकीय विचारसरणीच्या लोकांना त्यांचें योग्य प्रतिनिधित्व देण्याचें नाकारून नेमस्तच राष्ट्राच्या एकतेच्या आड येत आहेत. 'जहालांनीं आपल्या तत्त्वाशीं तडजोड केली पाहिजे', असें एकतेचें नांव घेऊन नेमस्त नेहमीं म्हणत असतात. परंतु त्यांचा स्वार्थ आणि सत्ताभिलाषा यांमुळें एकता निर्माण करण्याचा खरा मार्ग कोणता याचा विचार करण्यासहि त्यांना अवसर मिळत नाहीं.

आजकाल सर्वांच्या तोंडीं सदासर्वदा, वेळीं-अवेळीं जर कोणतें एक पालुपद येत असेल, तर तें हेंच कीं, 'देशांत एकी नाहीं, आमच्यांत एकी हवी!' आम्ही या गोष्टीला 'पालुपद' म्हणतो याचें कारण असें कीं, जे लोक आज एकतेसाठीं कंठशोष करीत आहेत त्यांना, एकता ही चीज खरोखर काय आहे, याच्या ज्ञानाचा अजिबात गंधहि नाहीं. इतरांचे स्वतंत्र विचार आणि वाढतें कर्तृत्व यांना पायमोड घालण्याचें एक प्रभावी साधन म्हणून या गोष्टीचा सर्रास दुरुपयोग केला जात आहे. सर्वांचे विचार आणि व्यवहार खरोखरीच एक असावेत अशी कांहीं त्यांची खरी इच्छा नाहीं; त्यांना हवा आहे फक्त एकतेचा देखावा. त्यांच्या सिद्धान्ताच्या मुळाशीं ही एकच कल्पना आहे कीं, कोणत्याच किंवा प्रत्येकच बाबतींत आमच्यांत एकवाक्यता नाहीं असें इंग्रजांना वाटतां कामां नये. परंतु ही परावलंबी व भेकड मनोवृत्तीचीं लक्षणें आहेत. यामुळें असत्य पोसलें जातें आणि भित्रेपणाला व खोटेपणाला प्रोत्साहन मिळतें. "तुमचा दृष्टिकोण कसाहि असो त्याला मुरड घाला, नाहींतर आपल्यांतील एकी नष्ट होईल; तुमच्या तत्त्वनिष्ठेला लगाम घाला, नाहींतर आपल्यांत एकता राहणार नाहीं; तुमच्या दृष्टीला सत्य दिसणाऱ्या गोष्टींसाठीं लढा देऊं नका, कारण आपल्यांतील एकतेला तडा जाईल; तुमचीं अगत्याचीं कामें बाजूला ठेवा, कारण तीं कामें करण्यांत जर तुम्ही गुंतलांत, तर आपल्यांत एकी कशी राहील?"—हें आहे आजचें रडगाणें. अशा ह्या निर्जीव आणि प्राणहीन एकतेचें वर्चस्व असणें हें राष्ट्राच्या मानभंगाचे दर्शक आहे; तर सजीव-जिवंत-एकता ही राष्ट्राच्या महानतेचें खरेंखुरें लक्षण आहे. जोपर्यंत भारत निद्रिस्त होता आणि फक्त स्वप्नांतच बडबडत होता, तोपर्यंत दिखाऊ एकतेचा हा पोकळ डोलारा निभावला. पण एकदां त्याचे डोळे उघडल्यावर हा डोलारा ढांसळणें अनिवार्य होतें. जोपर्यंत भिक्षावृत्ति हाच आपला मार्ग आणि उद्दिष्ट होतें, तोपर्यंत या नाटकाची जरूर होती; कारण अन्नदात्यासमोर आशेनें भीक मागतांना भिकारी कुटुंबाच्या मागणींत एकवाक्यता असायलाच हवी. सर्वांनीं एकाच स्वरांत रडलें-ओरडलें पाहिजे. परंतु बदलत्या परिस्थितींत या देखाव्याचें महत्व नाहींसें होतें.

एकतेच्या या कंठशोषामागें दुसरीहि एक कल्पना दडून बसली आहे. राष्ट्रामध्यें संपूर्ण आणि अव्यंग एकी–मतैक्य–असल्याशिवाय कुठल्याहि राष्ट्राला आपलें स्वातंत्र्य मिळवितां येत नाहीं, किंवा कोणतेंहि महान् कार्य करतां येत नाहीं, ही चुकीची धारणा या पाठीमागें आहे. वास्तविक या धारणेला कुठलाहि ऐतिहासिक आधार नाहीं. उलट तर वस्तुस्थिति अशी आहे कीं, देशावर जेव्हां अत्यंत दडपण येतें व जनतेच्या भावना जेव्हां संतप्त असतात, त्याच-वेळेस निरनिराळ्या कार्यप्रणाली आणि मतें यांतील भेद शिगेला पोंचलेले असतात. अमेरिके-च्या स्वातंत्र्ययुद्धापूर्वीच्या अत्यंत बिकट परिस्थितींत तेथील जनता अनेकधा भंगलेली होती. तेथील कांहीं प्रबल अल्पसंख्यांक तर सर्वस्वीं इंग्लंडच्याच बाजूचे होते, तर बिचकणाऱ्या बहु-संख्य जनतेला अंतर्गत स्वायत्तता तर हवी होती, पण त्यासाठीं कुठलाहि आततायीपणा करा-यला ती तयार नव्हती. परंतु कांहीं मूठभरच असे जहाल क्रांतिकारक होते, कीं ज्यांनीं जॉन ॲडमस् यांच्या नेतृत्वाखालीं सर्व देशभर क्रांतीची ज्वाला पसरविली आणि एक स्वतंत्र राष्ट्र निर्माण केलें. इटलीची क्रांतीहि आम्हांला हेंच दाखविते. जपानी जनतेच्या अप्रतिम एकतेकडे बोट दाखवून, आमच्यांतील त्याच उणीवेबद्दल गळा काढायची आम्हांला फार हौस आहे. परंतु जे लोक जपानचा सारखा उदोउदो करीत आहेत, ते त्यांच्या ऐतिहासिक थोर अज्ञानाचें मात्र प्रदर्शन करीत आहेत. कारण स्वातंत्र्ययुद्धाच्या सुरुवातीच्या तयारीच्या काळांत जपानमधील पक्षोपपक्षांत जेवढा, तीव्र आग्रही आणि खुनशी विरोध होता, तेवढा इतरत्र कोठेंहि दिसून आला नाहीं. अर्थात् हा मतभेद फक्त ध्येयसिद्धीच्या मार्गाविषयीं व पक्षांतील अंतर्गत संघटनेविषयीं होता––सर्व पक्षांचें अंतिम ध्येय मात्र एकच होतें. तें म्हणजे जपानचें स्वातंत्र्य व त्याचें वैभव. सर्व लोकांना मनोमन अशी खात्री होती कीं, जोपर्यंत शोगन या मवाळ पक्षाचें आणि मिकॅडो या जहाल पक्षाचें त्यांच्या अंतिम ध्येयाबद्दल मतैक्य होत नाहीं, तोपर्यंत ध्येयप्राप्तीसाठीं हिरीरीनें प्रयत्न करणें कांहीं कोणाला जमणार नाहीं.

राष्ट्रासाठीं जनतेनें केलेल्या आत्मसमर्पणावर राष्ट्राची खरी एकता अवलंबून आहे. आम-च्या मातृभूमीचें स्वातंत्र्य व तिची महानता हीच गोष्ट सर्वश्रेष्ठ व सर्वात महत्त्वाची ठरली पाहिजे. इतर सर्व गोष्टी त्यापेक्षां गौण समजल्या पाहिजेत. आज भारतांत तीन परस्पर-विरोधी ध्येयें सांगितलीं जात आहेत. एका पक्षाला इंग्रजांचें सार्वभौमत्व इथें असेंच चालू रहावें असें वाटत आहे; तर दुसऱ्या एका पक्षाला तीच गोष्ट कांहींशा रूपांतरित स्वरूपांत हवी आहे. तिसरा पक्ष भारताला स्वतंत्र व स्वयंशासित राष्ट्र बनविण्याची आकांक्षा धरीत आहे–फार तर इंग्लंडशीं निगडित पण त्याच्यावर अवलंबून नव्हे. जोपर्यंत भारताची बहुसंख्य जनता या तीन ध्येयांपैकीं कोणत्यातरी एका ध्येयाबद्दल एकमत होत नाहीं, तोपर्यंत एकतेचा देखावा व्यर्थ आहे. आतांपर्यंत एकतेचा हा देखावा येथें निभावला याचें कारण, मर्यादित स्वरूपांत कां होईना, पण इंग्रजांचें सार्वभौमत्व इथें असावें ही भावनाच येथें आतांपर्यंत प्रबळ होती. परंतु आतां तशी परिस्थिति नाहीं. नव्या आशा व नवे संकल्प राष्ट्राच्या जाणीवेंत शिरत आहेत. एकतर, या नव्या आशा-आकांक्षा संपूर्णपणें चिरडल्या गेल्या पाहिजेत किंवा प्रबळ तरी झाल्या पाहिजेत. तरच राष्ट्राच्या गुलामगिरीला मान्यता देणारा हा एकतेचा देखावा नाहींसा होऊन, नवजीवनदायी खरी एकता येथें प्रस्थापित होईल. ––श्रीअरविंद

(वंदेमातरम् २७-१०-१९०७)

# वाचकांचे प्रश्न

**बीजमंत्र म्हणजे काय ? अधिकारी गुरूकडून मंत्रोपदेश न घेतांहि मंत्र परिणामकारक होऊं शकेल काय ?**

अखिल विश्वाचा आविष्कार हा शब्दद्वारां, 'शब्द ब्रह्माच्या' द्वारां झालेला आहे.

बीजमंत्र म्हणजे बीजरूपांतील आद्यध्वनि. तो एकाक्षरी असेल किंवा अनेकाक्षरीहि असू शकेल. एकाद्या पदार्थाचा आद्य आविष्कार करतांना चेतनेच्या शक्तींच्या हालचालीनें सूक्ष्म ध्वनि-लहरी उत्पन्न होतात. मंत्रशास्त्राप्रमाणें, एकाक्षरी अथवा अनेकाक्षरी मंत्राच्या उच्चारानें जो ध्वनि निर्माण होतो, तो म्हणजे वर सांगितलेल्या सूक्ष्म ध्वनि-लहरींचाच मानवी ध्वनीमध्यें किंवा "वैखरी" वाणीद्वारां झालेला उच्चार होय. त्या सूक्ष्म ध्वनीला मंत्रशास्त्रांत 'मातृका' अशी संज्ञा आहे. ही मातृका म्हणजे कोणत्याहि निर्मित वस्तूचें खरेंखुरें 'नाम' असतें. या नामाचा जप अथवा उच्चारण करण्यानें त्या वस्तूला आपण चेतनेमध्यें आवाहन करतो, ती प्रत्यक्ष व्यक्त होण्यासाठीं एकप्रकारें आदेशच देतो. हेंच मंत्रापाठीमागचें मूळ तत्त्व आहे.

मंत्रांत जी देवता उल्लेखिलेली असते, ती म्हणजे परमेश्वराचीच एक विभूति असते. परमेश्वरच त्या देवतेच्या रूपानें आविष्कृत झालेला असतो. त्या देवतेचा आविष्कार होतांना विशिष्ट प्रकारचा ध्वनीहि उत्पन्न होत असतो. प्रत्येक देवतेचा भिन्न भिन्न ध्वनि अथवा मातृका असतात. ही 'मातृका' म्हणजे त्या त्या देवतेचें 'ध्वनि-शरीरच' किंवा 'ध्वनिरूप' म्हणतां येईल. हें ध्वनि–रूप ज्यावेळीं मानवी वाणीद्वारां प्रकट होतें, तेव्हां त्याला म्हणावयाचें मंत्र. हा मंत्र म्हणजे जाणीवेच्या पातळीवरचें त्या देवतेचें 'ध्वनि-शरीर' असतें. ती ती देवता जेव्हां प्रथम आविष्कृत झाली, तेव्हां ज्या ध्वनिलहरी उत्पन्न झाल्या होत्या, अगदीं तशाच लहरी या मंत्रोच्चारानें सर्वत्र पसरल्या जाऊन, त्या देवतेचा पुनरपि आविष्कार होण्याचा संभव निर्माण होतो. अशा रीतीनें मंत्रोच्चारानें आपण त्या देवतेस जागृत करीत असतो.

ही जागृति अथवा आवाहन परिणामकारक होण्यासाठीं ह्या आद्य शब्द-स्पंदनामध्यें गूढरूपानें जी शक्ति, जी चेतना संचरलेली असेल, तशाच शक्तीचा संचार या आवाहनमंत्रामध्यें, त्याच्या ध्वनिमध्यें असणें आवश्यक आहे, हें अगदीं उघड आहे. ती शक्ति जर त्यांत नसेल, तर तो मंत्र म्हणजे केवळ 'निर्जीव शब्द' होय. मंत्रांतील चैतन्य जागृत करून, तें कार्यान्वित करणें हें मुख्यतः साधावयाचें असतें; आणि ज्यानें स्वतः त्या मंत्राचा साक्षात्कार करून घेऊन ती मंत्रशक्ति स्वतःचे ठिकाणीं जागृत राखलेली असते असा गुरूच तें करूं शकतो.* हाच खरा मंत्रगुरू. असा गुरू ज्यावेळीं शिष्यास मंत्र देतो, त्यावेळीं तो नुसता शब्दोच्चार करीत नाहीं, तर त्या मंत्रध्वनिबरोबर मंत्रांतील चैतन्यहि शिष्याच्या ठिकाणीं संचारित करतो. त्यामुळें जेव्हां तो शिष्य त्या मंत्राचा पुनरुच्चार करतो, त्यावेळीं ते शब्द विशिष्ट परिणाम उत्पन्न करण्याच्या सामर्थ्यानें संपन्न असतात.

---

*स्वतःच्या तपस्येच्या बळानें एखाद्या मंत्रांत सामर्थ्य आणणें व तो जागृत करणें हें तत्त्वतः शक्य आहे; नाहीं असें नाहीं. तसेंच एकाद्या उच्चतर शक्तीकडून प्रत्यक्ष मंत्रोपदेश मिळणें, हेंहि शक्य आहे. कारण कित्येक वेळां असें घडलेलेंहि आहे. मुख्य मुद्दा हा आहे कीं, मंत्राच्या प्रथमच्या आविष्काराच्या वेळीं जी शक्ति, जें चैतन्य त्यांत होते, त्या शक्तीनें हा मंत्र भारलेला असला पाहिजे. —रेवान्.

# वाङ्मय आणि वाचन

**प्रश्नः**––आपल्या प्रगतीस वाङमयाच्या अभ्यासानें मदत होते काय ?

**उत्तरः**––बुद्धीची वाढ होण्यास, वस्तूंचें अधिक चांगल्या रीतीनें आकलन करून घेण्यास, वाङमय-प्रकारांचें ज्ञान करून घेण्यास, त्या बाबतींतील रुचि वाढविण्यास किंवा भाषाशैली संपादन करण्यास वाङमयाच्या अभ्यासाचा उपयोग होतो. म्हणजेच त्यानें मन संपन्न होतें, समृद्ध होतें.

प्रगतीचे अनेक प्रकार आहेत. तुम्हांला सर्वांगीण प्रगति करून घ्यावयाची असेल तर विविध मार्गांनीं ती तुम्हांला करून घेतली पाहिजे. वाङमयाच्या अभ्यासानें बौद्धिक आणि कलात्मक दोन्हींहि प्रकारची प्रगति एकदमच होते. कल्पना-विलास, कल्पनांचें आकलन, त्यांचें विश्लेषण आणि त्यांमध्यें सुरचना करणें ही कामें करतांना बुद्धीची वाढ होते, तर त्याचबरोबर कल्पनांचें बाह्य स्वरूप कसें असावें, शब्दांमध्यें त्या कशा व्यक्त कराव्या, आकलन सुलभ होण्यासाठीं त्या कलात्मक दृष्टीनें कशा मांडाव्या ह्याचा अभ्यास केल्यानें कलात्मक दृष्टीचा विकास होतो.

**प्रश्नः**––वाङमय, इतिहास, कथावाङमय किंवा कादंबरी यांमध्यें कित्येकदां असा विषय असतो कीं त्यामुळें आपली वृत्ति खालीं उतरल्यासारखी होते. अशा वेळीं त्यांतील विषय विसरून केवळ वाङमयीन दृष्टिकोणांतून वाचणें संपूर्णतः शक्य असतें काय ?

**उत्तरः**––तुमच्या मातृभाषेंत किंवा तुम्ही शिकत असलेल्या दुसऱ्या भाषेंत अशा कांहीं कादंबऱ्या असतात कीं, भाषाशैलीच्या दृष्टीनेंच केवळ त्या अत्युत्कृष्ट असतात, त्यावेळीं त्या वाचाव्यात कीं नाहीं ? कोणतेंहि लिखाण असलें तरी, तें जर चांगल्या तऱ्हेनें लिहिलें असलें तर तें वाचावयास हरकत नाहीं. पण तें वाचत असतांना काय लिहिलें आहे यापेक्षां तें कसें लिहिलें आहे हें पहाणें आगत्याचें आहे. त्यांतील विषयाकडे लक्ष न देतां केवळ भाषाशैलीच्या दृष्टीनें तें वाचलें पाहिजे. उदाहरणार्थ अशा पुस्तकांत कांहीं मनोरम वर्णनें असतात. वर्णन करतांना तें कसें हुबेहुब केलें आहे, शब्दयोजना किती समर्पक आहे हें पहावयाचें. कल्पनांच्या बाबतींतहि हेंच. निरनिराळ्या पात्रांच्या तोंडीं कोणतीं वाक्यें घातलीं आहेत, कोणता विषय मांडला आहे यापेक्षां त्या पात्रांची संभाषणें कलात्मक रीतीनें कशीं रचलीं आहेत हें पहावयाचें. वाक्यरचनेचा, भाषाशैलीचा, लेखनकलेचा ज्यावेळीं अभ्यास करावयाचा असेल, त्यावेळीं त्यांतील कथानकास तितकेंसें महत्त्व नाहीं. पण एकाद्या पुस्तकांतील विषयासाठीं, आशयासाठीं किंवा कथानकासाठीं जर तें तुम्ही वाचत असाल, तर मात्र पुस्तक निवडतांना अतिशय कडक राहिलें पाहिजे. ज्यामुळें तुमच्या जाणीवेची पातळी उतरेल, मन मलीन होईल, मनःस्थिति विचलित होईल अशीं पुस्तकें तुम्ही कधींहि निवडतां कामां नयेत. कारण त्यामुळें वेळेचा तर व्यय होतोच पण त्याहूनहि अधिक हानी होते. कांहीं पुस्तकांत तर गोष्टी अतिशय हलक्या दर्जाच्या असतात आणि

त्यांची मांडणीहि असंस्कृत असते. अशावेळीं निवड करण्याचा प्रश्नच उरत नाहीं. अशा पुस्तकांना तर तुम्ही स्पर्शसुद्धां करतां कामा नये. आजकाल, स्वस्तांमध्यें छापण्याच्या व चित्रें काढण्याच्या पद्धती निघाल्या आहेत, त्यामुळें अशा पुस्तकांचा विशेष प्रसार झाला आहे, अगदीं सुळसुळाट झाला आहे. अशा हीन कल्पना प्रसृत करणाऱ्या, रानटी, असंस्कृत कल्पनाचित्रें तुमच्यासमोर ठेवून तुमची कलात्मक दृष्टि, रसिकता बिघडवून टाकणाऱ्या वाङमयाला आजकाल सर्वच देशांत ऊत आला आहे; आणि या सर्वांचें कारण म्हणजे सर्वांस सहज सुलभ होतील अशा प्रकारचीं हीन दर्जाचीं पुस्तकें उत्पादनाच्या दृष्टीनें अतिशय स्वस्तांमध्यें काढणें शक्य झालें आहे हेंच होय. अशा तऱ्हेच्या स्वस्त आवृत्ती काढणाऱ्या लोकांच्या मनांत लोकशिक्षणाचा किंवा त्यांच्या प्रगतीचा विचार फारसा नसतो. उलट लोकांची प्रगति झाली तर आपला माल घेण्याचें ते नाकारतील म्हणून त्यांची प्रगती न झाली तर त्यांना बरेंच वाटतें. त्यांची दृष्टि असते पैशाकडे. त्यामुळें त्यांचें हें वाङमय जितकें अधिक खपेल तितकें त्यांना पाहिजेच असतें. मजकूर अतिशय बीभत्स कां असेना, त्याचा खप चांगला झाला म्हणजे झालें. आजकाल कला, संगीत, नाटय या सर्वच क्षेत्रांत ही स्थिति झाली आहे. जें क्षेत्र सुशिक्षित बुद्धिवादी व अभिजात कलावंत यांच्यासाठीं पूर्वी राखलेलें असें तें क्षेत्र, आधुनिक शास्त्रीय शोधांचा प्रत्यक्ष जीवनांत सार्वत्रिक उपयोग होऊं लागल्यामुळें, कोणालाहि खुलें झालें आहे. शिवाय आपलें प्रयत्न सार्थकी लागावेत व त्यापासून फायदा व्हावा म्हणून हे लोक, सहज विकलें जाईल असें स्वस्त वाङमय काढूं लागले आहेत. म्हणजेच अत्यंत हीन, सामान्य, असंस्कृत दर्जाचें, समजण्यास अतिसुलभ व त्यामुळेंच वाचावयास श्रम घ्यावें लागणार नाहींत किंवा जें वाचण्यास विशेष शिक्षणाची जरूर पडणार नाहीं असें वाङमय निघूं लागलें आहे. अशा वाङमयाची सबंध जगभर लाट उसळली आहे. त्यामुळेंच एकाद्या चांगल्या ग्रंथास किंवा उत्कृष्ट नाटकासहि कुठेंच स्थान मिळत नाहीं; निरर्थक वाङमयानें सारी जागा अडवून ठेवलेली असते. अर्थात् उत्कृष्ट वाङमयाचे अभिमानी याला प्रतिकार करण्याचा प्रयत्न करतात पण त्यांना फारच त्रास सोसावा लागतो. म्हणून अगदीं आवश्यक गोष्ट ही आहे कीं, आजच्या जगांतील ही बाजारी दृष्टि नाहींशीं केली पाहिजे. ही वृत्ति घालविण्यास कांहीं काळ तर लागणारच. तरीपण पूर्वीपेक्षां अशा तऱ्हेच्या वाङमयाचा मान आजकाल कमी झाल्याचीं चिह्नें दिसत आहेत. एक काळ तर असा होता, जेव्हां एकाद्यानें गाजावाजा केला नाहीं तर त्याला अपराधी धरत आणि त्यांतल्या त्यांत एकाद्यानें मोठ्या धाष्टर्यानें सत्कार्यासाठीं पैसा खर्च केला तर त्याला वेडयांतच काढीत. हल्लीं जरा परिस्थिति निवळली आहे, तरीसुद्धां योग्य दृष्टि यावयास अजून फार अवधि लागेल; अजूनहि जगावर पैशाचें अधिराज्य आहे, पैशाचें तट्टू पुढें रेटलें जात आहे. त्याचा संपूर्ण प्रभाव नाहींसा व्हायला कदाचित् बराच काळ लागेल. आजकाल या पैशाच्या वृत्तीनें मनुष्याचें मन इतकें ग्रासलें आहे कीं, पैसा हेंच सर्व गोष्टींचें प्रमाण होऊन बसलें आहे. अमेरिकेंत तर एकाद्याबद्दल बोलावयाचें झालें तर असें सांगतात, "आहो तो लक्षावधि डॉलर्सचा मालक आहे." हेंच त्याचें प्रशस्तिपत्रक ! "काय हो, तुम्हांला अमुक अमुक माणूस माहीत आहे कां ?" असें कोणी विचारलें तर "हो हो, तो शंभर डॉलर्स, हजार डॉलर्स किंमतीचा माणूस आहे" असें सांगितलें जातें ! म्हणण्याचा

अर्थ असा असतो कीं, इतका पगार त्याला मिळत आहे. तो बुद्धिमान् आहे कीं मूर्ख आहे, तो सज्जन आहे कीं दुर्जन आहे, हा प्रश्नच नाहीं. तो श्रीमंत आहे कीं गरीब? श्रीमंत असेल तर मला त्याची माहिती करून घेतलीच पाहिजे. पण गरीब असेल तर... मला त्याची कांहीं गरज नाहीं. त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं! अमेरिका हें बाल राष्ट्र आहे, साहजिकच त्याची जीवनरहाटीहि बालकवत् आहे--लाडांत वाढलेल्या मुला-सारखी! बरें, जीं पुरातन, म्हातारीं राष्ट्रें आहेत तीं फारच थकून गेलीं आहेत. त्यांच्यांत प्रतिकार करण्याइतकी ताकद राहिलेली नाहीं. त्यांना जणुं भोंवळ आलेली आहे आणि म्हणून राष्ट्राचें बालिशपणच अधिक बरें म्हणावयाचें कीं काय, असा प्रश्न त्यांच्यापुढें ठाकला आहे. अशी सर्व विचित्र परिस्थिति झाली आहे. सारें जग आज गांजून गेलें आहे, जणुं दुखणेकरी झालें आहे.

**प्रश्नः**--वाचनासाठीं पुस्तकांची निवड आम्हीं कशी करावी?

**उत्तरः**--पुस्तकांची माहिती असलेल्या कोणत्या तरी जाणत्यास हें विचारणें अधिक चांगलें. ज्याला वाङ्मयाची अभिरुची आहे आणि त्याचें ज्ञानहि आहे त्यांचा तुम्हीं सल्ला घेतलांत म्हणजे निदान वाईट पुस्तकें तरी तुमच्या हातीं पडणार नाहींत. आध्यात्मिक दृष्टीनें तुम्हां-ला उपयोगी पडणारें वाचन करावयाचें असेल तर गोष्ट निराळी. त्याहि बाबतींत, अध्यात्मिक सिद्धि मिळविलेल्या व्यक्तीचें तुम्हीं साह्य घेतलें पाहिजे.

या ठिकाणीं दोन प्रकारच्या जीवनधारा अगदीं भिन्न आहेत हें तुम्हीं समजावून घेतलें पाहिजे. एक आध्यात्मिक जीवन व दुसरें आध्यात्मिक जीवनाची पूर्वतयारी करून देणारें जीवन. तुम्हीं प्रयत्न केला तर तीं तुम्ही परस्परपूरक करूं शकाल. पण वास्तविक त्यांचें स्वरूप भिन्न आहे. आध्यात्मिक जीवनामध्यें पदोपदीं विवेक करावा लागतो, निवड करावी लागते. केवळ काय वाचावें या बाबतींतच नव्हे तर काय करावें, काय करूं नये, कसा विचार करावा, प्रत्येक कृति कशी करावी याचा सतत पावलोपावलीं निर्णय घ्यावा लागतो. आध्यात्मिक मार्गावरचे जें साहाय्यक असेल तेंच केवळ करावयाचें असें असलें तरी, हा मार्ग संकुचित, अति मर्यादित असला पाहिजे असें नाहीं. पण हें आध्यात्मिक जीवन सामान्य जीवनापेक्षां निदान थोडें तरी उच्चतर पातळीवरील असलें पाहिजे. संकल्पशक्ति आणि अभीप्सा एकाच उद्दिष्टावर केन्द्रित झालेल्या पाहिजेत. म्हणजे त्यामुळें साधक योग्य मार्गापासून दूर जाणार नाहीं, निष्कारण त्याला भटकावें लागणार नाहीं. अगदीं लहानपणीं हा मार्ग स्वीकारणें कठीण असतें. आपण मोठें व्हावें, व्यापक व्हावें, आपली प्रगति व्हावी अशी लहान मुलांची प्रवृत्ति असते. आपलीं जीं ज्ञानसाधनें आहेत, आपलें जें व्यक्तिमत्व आहे, आपण जे कांहीं आहो त्याची पूर्णपणें वाढ झालेली नाहीं, तें पुरेसें समृद्ध झालेलें नाहीं अशी त्याची भावना असते. म्हणूनच अगदीं दुर्मिळ अशीं उदाहरणें सोडलीं तर सामान्यतः आध्यात्मिक जीवनाची सुरुवात उशीरा होते; तत्पूर्वी जीवनाचा कांहीं विकास व्हावा लागतो.

दुसऱ्या प्रकारचें जीवन म्हणजे वाढीचें, उन्नतीचें. सर्व मानवी शक्तींचा, संभाव्यतांचा शक्य तितका संपूर्ण व सर्वांगीण विकास यांत साधावयाचा असतो. जाणीवेमध्यें सर्व मानवी शक्ती भरून

घेण्यासाठीं, केवळ असलेल्याच शक्ती फुलवावयाच्या किंवा भावी प्रगतीसाठीं सद्यःस्थितींतील जगताचें, चालू जीवनाचें आणि व्यक्तींचें ज्ञान करून घ्यावयाचें एवढेंच नव्हे तर, सुप्त शक्तींचीहि वाढ केली पाहिजे. सामान्यतः मुलांच्याकडून हीच अपेक्षा असते. अर्थात् एकादें अगदींच असामान्य मूल असलें तर त्याचें उदाहरण सोडून द्यावयाचें. कारण अशा मुलानें मागील जन्मीं सर्व प्रकारचे अनुभव घेऊन संपविलेले असतात; त्यामुळें कोणतेहि नवीन अनुभव घेण्याची गरज त्याला राहिलेली नसते. केवळ भगवंताचा साक्षात्कार करून घेऊन त्याचा आविष्कार जीवनांत करण्याचें त्याला बाकी राहिलेलें असतें. पण अशा तऱ्हेचें उदाहरण लाखांत एकादेंच सांपडतें. एरवीं विशिष्ट वयापर्यंत, जोपर्यंत तुम्ही लहान असतां तोपर्यंत तुम्हीं आपली उन्नति करून घेणेंच चांगले. सर्व प्रकारांनीं, सर्व बाजूंनीं तुम्हीं आपलें जीवन फुलविलें पाहिजे. तुमच्या आंतमध्यें ज्या कांहीं सुप्त संभाव्यता असतील त्या व्यक्त करावयाच्या, कार्यकारी करावयाच्या, त्या चेतवावयाच्या आणि अशा तऱ्हेनें पुढील विकास-मंदिरासाठीं भरभक्कम पाया तयार करावयाचा, हें तुम्हीं केलें पाहिजे.

म्हणूनच तुम्हीं प्रत्येकानें शिकलें पाहिजे, नेहमीं शिकत राहिलें पाहिजे, शिकण्याविषयीं तुम्हांला प्रेम वाटलें पाहिजे. मात्र व्यर्थ, निरुपयोगी गोष्टींची आपल्या जीवनांत केवळ भरती करण्यामध्यें वेळ वायां घालवतां कामा नये. तुमच्यामध्यें असलेल्या शक्ती अधिक समृद्ध, संपन्न करून नवीन शक्ती संपदान करावयाच्या आणि शक्य तितकें परिपूर्ण, विकसित मानव व्हावयाचें ह्या एकाच ध्येयावर तुम्ही सर्व चित्त एकाग्र केलें पाहिजे. याचा अर्थ हा कीं, या प्रकारच्या जीवनामध्यें सुद्धां तुम्हीं गंभीरपणें वागलें पाहिजे. आपण येथें आहोंत म्हणून केवळ कसातरी वेळ घालवावयाचा अशी वृत्ति असतां कामा नये. सर्वसामान्य माणसांची काय वृत्ति दिसून येते? ते जन्म घेतात, कां? त्यांना माहीत नसतें. कांहीं वर्षें आपणाला जगावयाचें आहे हें त्यांना माहीत असतें, पण कां? तें माहीत नसतें. जगांतील सर्व लोक एक दिवस हें जग सोडून जातात, म्हणून आपणालाहि तें सोडावें लागणार आहे याची त्याला जाणीव असते, पण त्याचें कारण मात्र त्याला अज्ञात असतें. जीवनांतील बराचसा काळ ते कंटाळलेले, त्रासलेले असतात. कारण ते जणुं रिकामे असतात; आणि या रिकामटेकडेपणामुळें त्यांना अधिकच कंटाळा येतो, म्हणून मन कोणत्या तरी विषयांत घालून आपलें जीवन भरण्याचा ते प्रयत्न करतात, त्यांच्या साऱ्या शक्ती विखरून गेलेल्या असतात, जेव्हां अंत ओढवतो तेव्हां, आपण आपल्या साऱ्या शक्ती, सर्व शक्यता उधळून टाकल्या आहेत असें त्यांना आढळून येतें. हजार लोकांपैकीं निदान नऊशें नव्वद लोकांची अशी स्थिति असते. ज्या विशिष्ट परिस्थितींत ते जन्माला आलेलें असतात त्याच परिस्थितींत शक्य तितक्या चांगल्या तऱ्हेनें वेळ घालवून, कमी कंटाळा यावा असा ते प्रयत्न करतात. फारसे कष्ट होऊं नयेत, आणि अधिकांत अधिक करमणुक व्हावी म्हणून ते झटतात. पण हें सर्व निष्फळ ठरतें; त्याचा कांहींच परिणाम होत नाहीं. जीवन मात्र नीरस, उदास, एक सांच्याचें रहातें. ते असा कांहीं विचार करीत नाहींत किंवा स्वतःला प्रश्न विचारीत नाहींत कीं, "खरेंच, मी येथें कशासाठीं जन्मास आलो आहे? ही पृथ्वी कां आहे? हीं माणसें कशाकरितां? माझें जीवन कशाकरितां आहे? ह्या सर्व विचारांत त्यांना कांहीं गोडी वाटत नाहीं. त्यांना मजा वाटते फक्त चांगलें खाण्यापिण्यांत.

स्वतःची करमणूक करावी, आरामांत, चैनींत वेळ घालवावा, मुलेंबाळें असावींत, भरपूर पैसा मिळवावा आणि आपल्या वासनापूर्तीसाठीं ज्या कांहीं अनुकूल गोष्टी मिळतील त्या मिळवाव्यात; आणि विशेष म्हणजे, कांहीं विचार करूं नये, डोक्याला शीण देऊं नये, कांहीं प्रश्न काढूं नयेत, आपलें बिनधोक जीवन जगावें ही एकच गोष्ट त्यांच्या आवडीची असते. ही झाली सर्वसामान्य स्थिति. यालाच लोक शहाणपण म्हणतात. असें हें जगाचें रहाट-गाडगें अनंत काळपर्यंत फिरत राहिलें तरी त्याची कधींच प्रगति होणार नाहीं. मुंग्या नाहींत कां ? त्या येतात, वर चढतात, सांठा करतात, मरतात, नाहींशा होतात; पुनः सांठा करतात, पुनः मरतात, असेंच चाललेलें असतें,––असें अनंत काळ चालूं शकेल. तशीच स्थिति या लोकांची असते. अर्थात् सुदैवानें असे कांहीं लोक असतात कीं, जे बाकी सर्व लोकांचे काम एकटेच करून टाकतात. अशाच लोकांच्या प्रयत्नानें फक्त सर्व कांहीं एक दिवस बदलून जाईल; एरवीं नाहीं.

आतां, पहिला मुख्य प्रश्न असा आहे कीं, तुम्हांला कोणत्या बाजूला जाण्याची इच्छा आहे, जे लोक कांहीं करून दाखवितात त्यांच्या बाजूला जायचें आहे, कां जे लोक कांहींच करीत नाहींत त्यांच्यांत सामील व्हावयाचें आहे ? जीवनामध्यें ध्येय शोधून काढून त्या-साठीं जे कांहीं आवश्यक प्रयत्न करतात त्यांच्या बाजूस तुम्हांस जावयाचें आहे कीं, जीवनाविषयीं विचार करण्याची जे फारशी कदर बाळगीत नाहींत, फिकीर करीत नाहींत आणि आला दिवस शक्यतर आरामानें काढण्याचा प्रयत्न करतात, त्यांच्यामध्यें स्वतःची गणना करून घ्यावयाची आहे ?

प्रथम हा निर्णय घेतल्यानंतर आणखी कित्येक गोष्टी आहेतच. पण पुढें कांहीं करण्या-पूर्वीं हा निर्णय आधीं तुम्हांला घेतलाच पाहिजे.

२१-९-१९५५. -श्रीमाताजींच्या प्रवचनाधारें.

CWMCE : Vol 07 : Page 309

तुम्ही जितके अधिक दुःखीकष्टी राहतां तितका शोकहि अधिक वाढतो व तितकेच मजपासून तुम्ही अधिक दूर जातां. भगवंत कांहीं दुःखी नाहीं आणि म्हणून त्याचा साक्षा-त्कार करून घेण्यासाठीं साहजिकच सर्व प्रकारचा शोक आणि भावनाविवशतेचें दौर्बल्य तुम्हीं तुमच्यापासून अगदीं दूर लोटून दिलें पाहिजे.

––श्रीमाताजी

# साहित्य-सत्कार

## Eighteen Principal Upanishads—Vol. I

**अष्टादश उपनिषद :**–संपादक–आचार्य वि. प्र. लिमये. आणि प्रा. रं. दे. वाडेकर. पृष्ठ संख्या. प्रस्तावना १०. मूलग्रंथ ७४८. प्रकाशक––वैदिक संशोधन मंडळ. पुणें २ किंमत रु. २०.

भारतीय तत्त्वज्ञान-ग्रंथांपैकीं, गीतेच्या खालोखाल उपनिषद्ग्रंथांनींच आधुनिक पंडित-वर्गाचें लक्ष सर्वांत अधिक वेधून घेतलेलें असलें व त्यासंबंधीं ग्रंथरचनाहि पुष्कळच झालेली असली, तरी आम्हांसमोर असलेल्या 'अष्टादश उपनिषदांच्या' खंडासारखा व इतका सविस्तर अभ्यासपूर्वक प्रयत्न आजवर कोणीं केलेला दिसत नाहीं; कारण या अप्रतिम ग्रंथाच्या प्रत्येक पृष्ठावर संपादकांच्या मूलगामी व सर्वांगीण दृष्टीचा प्रत्यय वाचकाला आल्याशिवाय रहात नाहीं. यापूर्वीं उपनिषदांवर जे कांहीं ग्रंथ झालेले आहेत ते अभ्यासाची एक विशिष्ट दिशा ठरवून लिहिले गेलेले आहेत. परंतु अनेक वैशिष्टयांनीं युक्त असा हा पहिलाच प्रयत्न आहे. मूळ मंत्र, पाठ भेद, अर्थविषयक व व्याकरणविषयक टीकात्मक टिपणें, उपनिषदान्तर्गत व वैदिक वाङमयांतील समान आशयाचे उतारे, शब्द व पाद यांची सूची, इतक्या गोष्टींचा समावेश असलेला हा ग्रंथ 'अपूर्व' आहे यांत शंका नाहीं. अर्थातच अशा वैशिष्टयपूर्ण ग्रंथाचें संपादन करतांना संपादकद्वयानें जे कष्ट व परिश्रम घेतले आहेत आणि त्यांत जी विद्वत्ता प्रत्ययास येत आहे, त्याबद्दल पंडित वर्ग त्यांना धन्यवाद देऊन त्यांचा नेहमींच ऋणी राहील.

या संग्रहामध्यें एकंदर अठरा उपनिषदांचा समावेश आहे; किंवा वास्तविक ती संख्या सतरा मानतां येईल. ईश, केन, कठ, प्रश्न, मुंडक, मांडूक्य, तैत्तिरीय, ऐतरेय, छांदोग्य, बृहदारण्यक, श्वेताश्वतर, कौशितकी, मैत्रेयणि हीं उपनिषदें घेतलेलीं आहेत.

याशिवाय बाष्कलमंत्रोपनिषद्, छागलेय उपनिषद्, आर्षेयोपनिषद् आणि शौनक उपनिषद् याहि उपनिषदांचा समावेश संपादकांनीं मुद्दाम या संग्रहांत केला आहे. कारण सर्वमान्य प्राचीन उपनिषदांतील विचार व ह्या उपनिषदांतील विचार यांत पुष्कळच साम्य आहे. केन उपनिषद् हा ज्या ब्राह्मणाचा एक भाग आहे असें जैमिनीय उपनिषद्-ब्राह्मणहि संपादकांनीं या खंडांत समाविष्ट केलें आहे. कारण उपनिषद् ग्रंथाचीं सर्व लक्षणें त्यामध्यें सांपडतात व दुसरें म्हणजे पंडितवर्गानें त्याचा सखोल अभ्यास करावा असेंच तें आहे.

उपनिषदांचा मूळ पाठ देतांना संपादकांनीं, मान्य अशा कित्येक आवृत्त्या, जुनीं मूळ हस्तलिखितें, यांचा आधार घेतलेला आहे. संपादकांनीं कांहीं ठिकाणीं आपलीं स्वतंत्र कारणें देऊन, स्वतंत्र असे शुद्ध पाठ सुचविले आहेत; 'जें शुद्ध असेल तें मूळच असलें पाहिजे असें नाहीं' हें प्रसिद्ध वचन डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनीं हे पाठ सुचविले आहेत असें त्यांनीं म्हटलें आहे. शेंकडों वर्षें परंपरेनें चालत आलेल्या श्रुतीच्या प्राचीन पाठांमध्यें एकाद्या अक्षराचाहि बदल करावयाचा असल्यास थांबून त्याआधीं शंभरवेळां विचार करण्याची जरूर आहे. कारण तर्कनिष्ठ बुद्धीच्या क्षेत्राच्या पलीकडे या श्रुतींचा उगम आहे आणि त्यांतील

प्रत्येक शब्दाला त्याचा स्वतंत्र अभिप्रेत अर्थ व महत्त्व असून त्याची पुरी गभीरता शोधण्याची जरूरी असते. असें केल्यानंतर मगच तर्कनिष्ठ बुद्धि त्यावर यथार्थतेनें शंका प्रदर्शित करूं शकेल. उदाहरणार्थ, 'सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म' (तैत्ति-उप. २-१) यामध्यें अनंतम् ऐवजीं 'आनंदम्' हा दुरुस्त पाठ संपादकांनीं सुचविला आहे. आम्हीं मूळ पाठ तसाच राहूं दिला असता. कारण अनंतत्व हें अधिक मूलभूत स्वरूपाचें सत्य आहे. अनंतत्वामुळेंच तर आनंदोद्भव आहे. 'यो वै भूमा तत्सुखम्'। अनंतत्वांतच 'सुख' आहे (छांदोग्य. ७-२३) अनंत या नामानें ब्रह्माचें वर्णन ऋषींनीं सहेतुकच केलें आहे. या एका शब्दांत सर्व तत्त्वज्ञान भरलेलें आहे--सूत्ररूपांत सर्व तत्त्वविचार सामावून टाकण्याचें उपनिषदांचें हें वैशिष्टयच आहे.

वैदिक वाङमयांतील समानार्थी उतारे हें या ग्रंथाचें अपूर्व वैशिष्टय असल्याचें संपादक सांगतात, तें अगदीं खरें आहे. कारण डॉ. रानडे किंवा डॉ. हास या सारख्यांनीं संपादित केलेल्या ग्रंथांत, शब्द व विचार या बाबतींत साम्य असलेले उपनिषदांतील उतारे फक्त दिले आहेत. परंतु या ग्रंथानें आणखी पुढें पाऊल टाकून, केवळ औपनिषदिकच नव्हे, तर सर्व वैदिक वाङमय आणि यास्काचें निरुक्त, पाणिनीची अष्टाध्यायी या वेदांगांतून व महाभारता-सारख्या ग्रंथांतूनहि उतारे काढले आहेत. मधून मधून जैन, बौद्ध व ग्रीक समानार्थी विचार-धारांचाहि उल्लेख सांपडतो. अर्थात् एवढयानें सर्वच क्षेत्र संपलें असें नव्हे आणि संपादकहि तसें म्हणत नाहींतच. मधून मधून क्वचित् ठिकाणीं कांहीं महत्त्वाचे उल्लेख गळले आहेत. उदा० ईशोपनिषदाच्या १५ व १६ श्लोकांतील, 'हिरण्मयेन पात्रेन सत्यस्यापिहितं मुखम्'। यास समानार्थक म्हणून श्रुतवित् अत्रीची एक प्रसिद्ध ऋचा (५-६२-१) 'ऋतेन ऋतं अपिहितम्'। ही उद्धृत करतां आली असती. कारण दोहोंमध्यें एकाच प्रकारच्या, आध्यात्मिक व मनोवैज्ञानिक अनुभूतीचें वर्णन आहे. अर्थात् ईशोपनिषदांतील वर्णनावरून, गूढार्थ व्यक्त करण्याची अधिक स्पष्ट पद्धति दिसून येते इतकेंच.

जवळ जवळ दोनशेंहून अधिक पृष्ठें म्हणजे ग्रंथाचा तिसरा हिस्सा, भारतीय तत्त्वज्ञाना-च्या अभ्यासकांना अतिशय उपयुक्त अशा विभागाचा आहे. त्यांत उपनिषदांतील शब्द व पदें यांची सूची दिलेली आहे.

यानंतर जो खंड प्रसिद्ध होणार आहे, त्यांत या अठरा उपनिषदांचा इंग्रजी अनुवाद व इंग्रजीच स्पष्टीकरणात्मक टिपणें देण्यांत येणार असून, विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांत औपनिषदिक संस्कृत शब्दांच्या व्युत्पत्ती देणारा एक मोठा व्युत्पत्तिकोशच समाविष्ट केला जाणार आहे, असें संपादकांनीं या खंडाच्या सुरुवातीलाच अभिवचन दिले आहे. व्युत्पत्ति-शास्त्रांत अलीकडे अलीकडे झालेली प्रगति व या दिशेनें झालेले प्रयत्न लक्षांत घेऊन या उप-निषदांतील सर्व महत्त्वाच्या शब्दांच्या व्युत्पत्ती दिल्या जाणार आहेत. अशा या खंडाच्या प्रसिद्धीची आम्ही आतुरतेनें वाट पहात आहोंत.

आणखी एक महत्त्वाचा उल्लेख करावयाचा. या ग्रंथाच्या मुखपृष्ठावर सातव्या-आठव्या शतकांतील प्रोटो-बल्गेरियन शिलाचित्राचा फोटो देण्यांत आला आहे, तो महत्त्वाचा आहे. एकमेकांकडे तोंड करून एका फांदीवर बसलेले दोन पक्षी त्यांत दाखविले आहेत. त्यांतील एक पक्षी पानासारख्या वस्तूस आपली चोंच लावीत आहे व दुसरा त्याकडे नुसता पहात आहे. त्या चित्राखालीं, त्याचा आशय स्पष्ट करणारा ऋग्वेद व उपनिषदांतील 'द्वा सुपर्णा

......' हा प्रसिद्ध व औचित्यपूर्ण श्लोक उद्धृत केला आहे. फार प्राचीन काळींहि भारतीय विचारांचा प्रभाव किती दूरवर पडलेला होता, हें मोठ्या कुशलतेनें, या चित्राचे द्वारां, वाचकवर्गाच्या ध्यानांत आणून दिलें आहे.

—मा. पुं. पंडित.

★

*The Teaching of Sri Aurobindo*—By M. P. Pandit. Publishers 119 Sri Aurobindo Study Circle, Madras 5. Price Rs. 4.

ओघवती आणि सामर्थ्यवती शैलीच्या प्रभावानें उमललेलें हें एक जणुं टवटवीत आणि मनोहर विचारपुष्पच. श्रीअरविंदांच्या अफाट वाङमयामधून वाहणारा विचार-प्रवाह यांत सामान्य जनांना उपलब्ध करून दिलेला आहे.

पुस्तकाच्या सुरुवातीसच लेखकानें निरनिराळ्या जगत्-विषयक तत्त्वप्रणालींचें विवरण करून नंतर श्रीअरविंदांचा जीवनविषयक दृष्टिकोन दाखवून दिला आहे. हें करीत असतांना या तत्त्वप्रणालींच्या अपूर्णतेबरोबरच त्यांनीं तत्त्वज्ञानक्षेत्रांत घातलेली भर या विषयींचा उल्लेख जातां जातां करतां आला असता; कदाचित् विस्तार-भयानें लेखकानें तसें केलें नसल्याचा संभव आहे. असो.

या नंतर श्रीअरविंदांच्या पूर्णयोगाची थोडक्यांत कल्पना देऊन आजची मानवजात सामाजिक व मानवी एकतेच्या ध्येयाप्रत कशी जात आहे याविषयींचे विधायक विचार मांडले आहेत. वेद, वेदांत आणि गीता यांची शिकवण श्रीअरविंदांच्या मूलभूत शिकवणीशीं कशी जुळणारी आहे हें सांगतांना, लेखकाचा या विषयाचा व्यासंग दिसून येतो; तसेंच, श्रीअरविंदांची शिकवण उज्ज्वल भारतीय परंपरेशीं विसंगत असल्याचा कांहीं लोकांचा गैरसमजहि दूर होण्यास या विवेचनाची मदत होते.

पुस्तकाचें बाह्यांगहि त्यांतील अंतरंगाइतकेंच आकर्षक आहे.

—पी. सी.

★

**श्रीअरविंद लोक-साहित्य**—पुष्पें १ ते ५. श्रीअरविंद योगमंदिर—ज्वालापूर (हरिद्वार) किंमत प्रत्येकीं ४ आणे.

प्रत्येकीं ३२ पृष्ठांचीं पहिलीं चार पुष्पें हिंदीमध्यें व पांचवें पुष्प The Integral Yoga हें इंग्रजीमध्यें आहे. श्रीमाताजींचीं स्फुटवचनें, श्रीअरविंदांच्या साधना-मार्गाची त्यांच्याच शब्दांत ओळख, श्रीअरविंदांचें अल्प चरित्र इत्यादि विषयांचा त्यांत समावेश आहे. श्रीअरविंद व श्रीमाताजी यांच्या शिकवणीचें सार समजून घेण्यास हीं पुष्पें मार्गदर्शक होतील अशी खात्री आहे.

★

# आश्रम-वृत्त

**शिक्षण विभाग--**

जगांतील आणि भारतांतील प्रमुख भाषांविषयीं आवड निर्माण करून त्यांतील वाङ्मयाचा रसास्वाद घेतां यावा म्हणून शाळेच्या हिंदी विभागातर्फे एक व्याख्यानमाला सुरूं करण्यांत आली आहे. आतांपर्यंतच्या व्याख्यानांत तामीळ, उर्दू व गुजराथी या भाषा, त्यांचा इतिहास, सांस्कृतिक कार्य व प्रमुख लेखक यांचा परिचय करून देण्यांत आला.

**श्रीअरविंद आश्रम, दिल्ली शाखा--**

२३ एप्रिल १९५६ रोजीं दिल्ली येथील मेहरौली स्ट्रीटवरील श्रीअरविंद आश्रमाच्या शाळेचें उद्घाटन झालें होतें. आतां दुय्यम शाळा म्हणून तिला सरकारी मान्यता मिळालेली असून तिचा अभ्यासक्रम एका विशिष्ट पद्धतीवर आंखलेला आहे. सध्यां तेथें अकरा मातृभाषांचे मिळून एकंदर ३२१ विद्यार्थी व १५ शिक्षक आहेत.

**शारीरिक शिक्षण विभाग--**

या तिमाहीमध्यें टेबल टेनिस, टेनिस, फूटबाल, व्हॉली बॉल, सॉफ्ट बॉल, क्रिकेट, हॅंडबॉल या खेळांचे सामने झाले. खेळाडूंच्या क्षमतेप्रमाणें त्यांचे गट पाडल्यामुळें, वेगवेगळ्या वयांचे खेळाडू एकाच चढाओढींत असल्यामुळें सामने चुरशीचे व प्रेक्षणीय झाले. भारतीय खेळांपैकीं खोखो व जर्मन खेळ श्लॅग बॉल (Schlag ball) हे नवीन खेळ खेळण्यांत आले. एकूण ३९१ उमेदवारांनीं भाग घेतला होता. ४ मार्च रोजीं श्रीमाताजींच्या हस्तें पारितोषिक वितरण-समारंभ झाला.

मद्रास विद्यापीठाचे टेनिस-चॅंपियन श्री. श्रीनिवासन्, ज्युनिअर चॅंपियन श्री. प्रभाकर आणि डेन्मार्कचे चॅंपियन, डेव्हिस कप चे खेळाडू व कराची येथें आशियाचें टेनिसचें विजेतेपद मिळविणारे श्री टारबेन अल्रिच यांचा १७ फेब्रुवारी रोजीं आश्रमाच्या टेनिसकोर्टवर टेनिसचा प्रेक्षणीय खेळ झाला. खेळ पाहण्यास श्रीमाताजी स्वतः उपस्थित होत्या.

**कला-विभाग--**

आश्रमांतील नवोदित कलावंतांना संगीत कलेमध्यें शिक्षण व उत्तेजन देण्यासाठीं विविध प्रकारच्या गायन-वादनाच्या टेप-रेकार्डस् घेऊन त्यांचा दरमहा सुश्राव्य कार्यक्रम सुरू करण्यांत आला आहे.

**ग्रन्थालय-विभाग--**

श्री सुरेन्द्रमोहन घोष (M. P.) यांच्याकडून भारत सरकारच्या ३००० प्रकाशनांची देणगी मिळाली.

ताडपत्रावर लिहिलेलीं कांहीं हस्तलिखितेंहि मिळालीं असून त्यांतील एक शंभर वर्षांहून जुनें आहे.

शारीरिक-शिक्षण-विभागाचें ग्रंथालय आहे; त्यास श्री. प्रबोधकुमार डे यांनीं आपल्या खाजगी संग्रहांतील २५० उत्कृष्ट ग्रंथ व नियतकालिकें दिलीं आहेत.

**प्रदर्शनें--**

या तिमाहींतील पहिलें प्रदर्शन श्री हॅरी मिलर व सौ. रेवती मिलर यांनीं मांडलें होतें. श्री. मिलर यांनीं काढलेले प्राण्यांचे फोटो व सौ. मिलर यांचें मातीच्या भांड्यांवरील नक्षी-काम प्रेक्षणीय होतें.

श्री. पुलिन दास यांनीं भरविलेल्या, लहान मुलांच्या चित्रकलेच्या प्रदर्शनांत अगदीं तीन चार वर्षांच्या मुलांनीं काढलेल्या रेघोट्यांपासून ते तेरा चौदा वर्षांच्या मुलांचीं चित्रें होतीं. लहान मुलांमधील कलेच्या अभिरुचीचा विकास व बालमानसशास्त्राचा अभ्यास करण्यास हें प्रदर्शन फारच उपयुक्त होतें. मुलांच्या संवेदना व रंगरचना यांची संगति कशी असते हेंहि त्यांत दर्शविण्यांत आलें होतें. आश्रमांमधील कांहीं मुलांनीं काढलेल्या चित्रांवरून त्यांची आश्चर्यकारक प्रगति दिसून आली.

**थोरांच्या भेटी--**

झर लिप्पी बिस्टरफेल्ड (Zur-Lippe-Biestarfeld) येथील राजपुत्र व राज-कन्या आश्रमांत कांहीं दिवस राहून आश्रमाचे निरनिराळे विभाग पाहून गेले. 'लिप्पी'चे राजपुत्र हे न्यूयार्क येथील सरकारी कला-संग्रहालयाचे व्यवस्थापक आहेत. 'गोळकोंड' इमारतींत कायम मांडून ठेवलेलें संपूर्ण जपानी जीवनाचें प्रदर्शन त्यांना फारच आवडलें.

कॅलिफोर्निया विद्यापीठाचे पदार्थविज्ञानशास्त्राचे प्राध्यापक कर्ट फार्स्टेर, पॅरिस विद्या-पीठांतील 'धर्माचा इतिहास' या विषयाचे व्याख्याते फिलिप लावास्टीन व मद्रास राज्याच्या दक्षिण-विभागांतील शाळांच्या इन्स्पेक्ट्रेस कु० विशालक्ष्मी यांनीं आश्रमाच्या शाळेस भेट दिली.

आश्रमाला भेट देणारे आणखी एक प्रमुख पाहुणे, म्हणजे नवी दिल्ली येथील 'नॅशनल फिजिकल लॅबारेटरीचे' संचालक श्री. के. एस्. कृष्णन् हे होत.

**संकीर्ण वार्ता--**

श्रीमाताजींनीं १२ फेब्रुवारी रोजीं श्रीअरविंदांचे अवशेष वंगवाणीचे चालक श्री. गोविंद-लाल गोस्वामी यांच्या स्वाधीन केले. नवद्वीप येथें २१ फेब्रुवारीस त्या अवशेषांची प्रतिष्ठा-पना करण्यांत आली.

महाराष्ट्रामध्यें अकोट व अकोला या दोन ठिकाणीं श्रीअरविंद-मंडळांची नुकतीच स्थापना झाली. दि. १४ व १५ फेब्रुवारीस दोन्हीं ठिकाणीं हारदा येथील अॅडव्होकेट श्री. एस्. टी. खिर-वाडकर व प्रसिद्ध हिंदी साहित्यिक श्री राजेन्द्रसिंहजी यांचीं उद्बोधक व्याख्यानें झालीं.

# विचार-रत्नें

धैर्यवान् हो आणि स्वत:विषयीं इतका विचार करीत बसूं नको. तुझा क्षुद्र अहंकार, तूं आपल्या सर्व विचारक्षेत्राचें केंद्र केला आहेस, त्यामुळेंच तूं दु:खी व असंतुष्ट आहेस.

स्वत:स विसरून जाणें, हें सर्व तऱ्हेच्या अस्वास्थ्यावर मोठें रामबाण औषध आहे.

CWM : Vol 16 : Page 175

*

देहानें तूं माझ्यापासून दूर असशील पण विचार मात्र एकसारखा माझाच करीत असशील तर, माझ्याजवळ बसून दुसऱ्याच गोष्टीचें चिंतन करीत बसलेल्यापेक्षां तूं माझ्या कितीतरी अधिक सन्निध राहशील.

*

बंद दरवाजा उघडण्यासाठीं मन मोकळें करणें ह्यापेक्षां दुसरा अधिक चांगला उपाय नाहीं. जें कांहीं सांगावयास तूं भीत असशील, ती गोष्ट मन उघडें करून मला निवेदन करतां-क्षणींच तूं माझ्या निकट आल्याचा तुला अनुभव येईल.

*

आपली चेतना एकाद्या पक्षाच्या पिल्लासारखी आहे. या पिल्लानें आपल्या पखांचा उपयोग करण्यास शिकलें पाहिजे.

CWMCE Vol : 15 Page : 244

*

अहोरात्र, एकसारखे प्रभुसान्निध्य आहेच.

निश्चल-नीरव बनून अंतर्मुख होणें पुरेसें आहे. कारण तत्क्षणीं त्या सान्निध्याचा प्रत्यय तुम्हांस येईल.

—श्रीमाताजी

## वाचकांस विनंति

दर्शनदिनास प्रसिद्ध होणारा प्रत्येक अंक प्रसिद्धीनंतर एक आठवड्यानें, म्हणजे अनुक्रमें २१ ऑगस्ट, १ डिसेंबर, १ मार्च आणि १ मे रोजीं रवाना केला जाईल. त्यापूर्वी वाचकांनीं पत्रव्यवहार करूं नये.

– संपादक



## मराठी प्रकाशनें

१ श्रीअरविंद-दर्शन (वार्षिक मुंबई सर्कल) किं २ रु.

२ योग व त्याचे उद्देश – श्रीअरविंद किं.१२ आणे

३ कारागृहांत श्रीकृष्ण दर्शन (उत्तरपारा भाषण) – श्रीअरविंद किं.४ आणे

४ 'वंदेमातरम्' (लेखसंग्रह) – श्रीअरविंद किं. ४ आणे

५ परम शोध – श्रीमाताजी किं. ६ आणे

६ चार तपस्या व चार मुक्ती – श्रीमाताजी किं. १२ आणे

७ महान् रहस्य (नाटिका) – श्रीमाताजी किं.१ रु.

८ श्रीअरविंदांचा संदेश व आश्रम कि.१२ आणे

९ बाळ गंगाधर टिळक – श्रीअरविंद किं. ८ आणे

१० खेडीं हा स्वराज्याचा पाया (व्याख्यान) – श्रीअरविंद किं. ४ आणे

११ दिव्य जीवन (संकलित वेचें) – श्रीअरविंद किं. २५ न.पै.

१२ सत्यगिरीचें आरोहण (नाटिका) – श्रीमाताजी किं. ५० न.पै.

ट.ख.वेगळा

श्रीअरविंद सर्कल ३९१ सदाशिव पुणे २.

'संजीवन कार्यालय' श्रीअरविंद आश्रम, पाँडिचेरी